पत्त्यांचा बंगला

[तीन अंकी सामाजिक नाटक]

लेखिका :

सौ. उमाबाई भट

मूल्य एक रुपया

इनामदार बन्धु
प्रकाशन, पुणे २

या नाटकाचा पहिला प्रयोग दि. २९।९।५७ रोजीं वाई येथें महिला-मंडळांतील भगिनींनी नवरात्रोत्सवांत केला. या प्रयोगांत काम केलेल्या भगिनींचीं नांवें —

माधवराव	—	सौ. ताराबाई कापरे
मधुकर	—	सौ. शांताबाई साळवेकर
प्रकाश	—	सौ. मंगला जोशी
अरुण	—	चि. गणेश जोगळेकर
सुधाताई	—	सौ. प्रमिला प्रभुणे
मीनाताई	—	सौ. सिंधुताई गोगटे
मालती	—	सौ. मंदाताई सहस्रबुद्धे
सखू	—	सौ. जयश्री देवधर

[illegible] पत्ता :
सौ. [illegible] भट, C/o श्री. स. कृ. भट, वकील,
मु. पो. वाई (जि. सातारा.)

प्रकाशक : [illegible] इनामदार, इनामदार बन्धु प्रकाशन
९९१ सदाशिव, पुणें २.

आवृत्ति पहिली : मकरसंक्रांत, शके १८७९

मुद्रक : मा. प. तळेकर, श्री दत्त मुद्रणालय
३३५ शनवार, पुणें २.

पुरस्कार

सौ. उमाबाई भट यांचें हें छापील असें पहिलें पण वस्तुतः दुसरें नाटक. त्यामुळे नाटकाचें वाचन झाल्यावर एक नाटक लिहिल्याचा सराईतपणा या नाटकाच्या संवादांत आढळून आला. नाटकाचा विषय जिव्हाळ्याचा आणि कौटुंबिक आहे. नाटकाची मांडणी थोडी कृत्रिम वाटली तरी ती प्रयोगदृष्ट्या पोषक ठरेल असें वाटतें. संवाद घरगुती आहेत आणि प्रसंग नेहमीचे अनुभवांतले आहेत. त्यामुळे अनुभूतीचा आनंद या नाटकाच्या प्रत्यक्ष दर्शनाने व्हावा असें वाटतें. 'पत्त्यांच्या बंगल्या' च्या प्रतीकाचा उपयोग चांगला केला आहे. एका गृहिणीने हें नाटक लिहिल्याने त्यांतील सहजपणा जाणवण्यासारखा आहे. अशाच तऱ्हेने जिव्हाळ्याच्या विषयावर लेखिकेने नाटकें लिहिण्याचा उपक्रम केला तर याहिपेक्षा चांगल्या कलाकृति तिच्या हातून निर्माण होतील. शाळा, कॉलेजें, महिला समाज इत्यादींच्या संमेलनप्रसंगीं या नाटकाचा प्रयोग केल्यास सोयीचा व यशस्वी होईल. असेंच लेखन लेखिकेने पुढे चालू ठेवून चांगल्या नाट्यकृति जनतेसमोर ठेवाव्या ही इच्छा.

पुणे

ता. १४-१-१९५८ —भा. वा. केळकर

लेखिकेचें निवेदन

गेल्या वर्षी 'दुसरें चाक' ही माझी पहिलीच नाटिका महिला-मंडळांतील माझ्या सहकारी भगिनींनी रंगभूमीवर आणली. त्यामुळे उत्तेजन मिळून यंदा 'पत्त्यांचा बंगला' हें दुसरें नाटक मीं लिहिलें.

हल्लींचें मध्यमवर्गीय कुटुंब हा एकखांबी तंबू असल्याने त्याची अवस्था पत्त्यांच्या बंगल्यासारखी आहे. परिस्थितीच्या झुळुकीने तो केव्हा कोलमडून पडेल, याची शाश्वती राहिलेली नाही. त्यांतून कूळ-कायद्यासारख्या नवीन नवीन कायद्यांमुळे तर मध्यमवर्गीय कुटुंबाची घडी अधिकच विस्कटली आहे. ही विस्कटलेली घडी पूर्ववत् बसविण्याची जबाबदारी चालू पिढीवर येऊन ठेपली आहे. या नाटकांत हीच गोष्ट प्रामुख्याने दाखविण्याचा अल्पसा प्रयत्न मीं केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे, हें आपणच ठरविणार आहांत.

हें नाटक लिहीत असतांना माझ्या सहकारी भगिनी सौ. प्रमिला प्रभुणे, सौ. ताराबाई कारे आणि सौ. सिंधुताई गोगटे यांनी मला वरचेवर उत्तेजन दिलें म्हणूनच मी तें लिहूं शकलें, हें येथे नमूद करणें मी माझें कर्तव्य समजतें.

'पत्त्यांचा बंगला' या माझ्या नाटकाचा प्रथम प्रयोग दि. २९-९-५७ रोजीं वाई येथें महिला मंडळांतील भगिनींनी केला. ज्या भगिनींनी हा प्रयोग रंगभूमीवर यशस्वी रीतीने करून दाखविला, त्यांची मी सदैव ऋणी आहे. शिवाय हा प्रयोग पहाण्या-साठीं श्रीमंत छत्रपति सुमित्राराजे भोसले, अध्यक्ष उ० सातारा जिल्हा महिला मंडळ, या मुद्दाम सातारहून आल्या आणि त्यांनी माझ्या या कलाकृतीचा गौरव केला म्हणून मी त्यांचे आभार मानतें. तसेंच सुप्रसिद्ध नाट्य-दिग्दर्शक श्री. भालबा केळकर यांनी हें नाटक तपासून योग्य तें मार्गदर्शन केलें आणि त्याचा पुरस्कार केला, याबद्दल त्यांचे व 'इनामदार बंधु प्रकाशन'चे श्री. बाबुराव शामराव इनामदार यांनी माझें हें पहिलेंच नाटक पुस्तकरूपाने प्रकाशित केलें म्हणून त्यांचे आभार मानून मी हें निवेदन संपवितें.

वाई

ता. १४-१-१९५८ —सौ. उमाबाई भट

अंक पहिला

[काळ : सध्याचा. वेळ : दुपारीं तीन ते चार. स्थळ : तालुक्याच्या गावांतील एका मध्यमवर्गीय कुटुंबाचें घर. डाव्या बाजूस मुख्य दरवाजा— उजव्या बाजूस स्वयंपाकघराकडे जाण्याचा दरवाजा. तीन खोल्यांच्या ब्लॉकमधील ही उठण्या-बसण्याची खोली. खोलींत उजव्या बाजूस एक टेबल व खुर्ची. मधे एक जुन्या पद्धतीचा शिसवीचा सोफासेट. पडदा उघडतो तेव्हा माधवराव, सुधाताई व मालती पत्ते खेळत आहेत. डाव संपलेला असून माधवरावांवर 'गाढव' होण्याची पाळी आलेली आहे!]

मालती : बाबा, डाव तुमच्यावर उलटला हं!

माधवराव : म्हणजे थोडक्यांत मी गाढव झालों असंच म्हण की! हं! चालायचंच—

मालती : इश्श ! बाबा, तुम्हांला कसं गाढव म्हणायचं?

माधवराव : कां? काय झालं न म्हणायला? अग, हा पत्त्यांचा खेळ आहे. खेळ लहान-मोठं कांही जाणत नाही. जो हरेल तो गाढव! आणि मी आत्ता हरलोंय् म्हणजे मला गाढव म्हणायला कांही हरकत नाही!

मालती : अं हं! मोठ्या माणसांना कुणी गाढव म्हणतं का?

सुधाताई : बरं, पण आता डाव संपला ना? मग कशाला हा वाद?

माधवराव : मालती, हा वाद संपविण्याची एक नामी युक्ति सांगूं का? आत जा आणि फक्कडसा चहा करून आण.

[मालती हसते आणि आत जाते.]

माधवराव : या पोरीशीं पत्ते खेळणं आता सोडून दिलं पाहिजे. फार चावट झालीय् पोरटी. माझ्यावर डाव आला की सारखं हसूं येतं तिला.

सुधाताई : तुमच्यावरच असं नाही—मागच्या रविवारीं माझ्यावर डाव उलटला तेव्हासुद्धा ही पोरटी हसायला लागली. तिला असं वाटतं की, मोठ्या माणसांच्या सर्व गोष्टी बरोबर आल्याच पाहिजेत.

माधवराव : खेळांतसुद्धा? खेळाचं नशिबावर बरंचसं अवलंबून असतं. डावच चांगला आला नाही तर चांगला खेळणारा तरी काय करणार?

सुधाताई : ती अजून अल्लड आहे. तिच्या बालिश स्वभावामुळं ती हसत होती इतकंच.

[माधवराव पत्ते गोळा करीत असतात, तोंच अरुण धावत धावत बाहेरून येतो.]

अरुण : बाबा, मी येणार आज पत्ते खेळायला. मी येणार —,

माधवराव : आज नको हं बाळ! पुढच्या रविवारीं किनई —

अरुण : तें कांही नाही! मला ठाऊक आहे. दर वेळेला पुढच्या रविवारीं— पुढच्या रविवारीं म्हणतां आणि मला कधीच घेत नाही खेळायला! तें कांही नाही! आज मी —

माधवराव : अरे, पण तुला पत्ते खेळायला यायचे नाहीत. तूं अजून लहान आहेस. तुला मोठेपणीं पत्ते खेळायचेच आहेत. आणि आम्ही मोठं झालों तरी आम्हांला कुठं चांगलं खेळतां येतंय्?

अरुण : पण तरी तुम्ही खेळतांच की नेहमी नेहमी. तें कांही नाही. मी आज येणारच. आपण भिकार - सावकार खेळूं.

माधवराव : आता सावकार नाही आणि भिकार नाही. मग तो खेळ तरी कशाला खेळायचा!

सुधाताई : आता राजा नाही आणि राणी नाही, पण राजा-राणी घेऊन पत्ते खेळतोंच ना आपण! त्याच्या समजुतीकरिता तरी भिकार-सावकार खेळा की.

माधवराव : झालं ! म्हणजे गाढव झालों म्हणून पोरगी हसली. आता भिकारी झालों की पोरगा हसेल ! एकूण काय—

अरुण : नाहीतर बाबा, आपण पत्त्यांचा बंगला बांधतां का ?

माधवराव : हं ! असं कांहीतरी शहाण्यासारखं बोल ! पत्त्यांचा बंगला मात्र मला झक बांधतां येईल. मी किनई तुझ्याएवढा होतों ना, तेव्हा नेहमी पत्त्यांचा बंगला बांधायचों. चल, आपण दोघंहि बांधूं बंगला. पण एका अटीवर ! बंगला पडला तर रडायचं नाही.

अरुण : खरंच बाबा, मी रडणार नाही. अगदी नक्की–शपथ—

[दोघंहि पत्त्यांचा बंगला बांधूं लागतात. मालती ट्रेमध्ये चहाचे कप घेऊन येते. सर्वांना देते. शेवटीं अरूजवळ येते.]

मालती : अरे वा ! पत्त्यांचा बंगला वाटतं ! आहे बुवा ! अरू, तुला पत्त्यांच्या बंगल्याचं गाणं येतं का रे ? आमच्या बाईंनी त्याच्यावर एक गाणं केलंय्.

माधवराव : असं ? मग म्हण बघूं. म्हणजे तुझ्या त्या गाण्याच्या तालांत आमच्या बंगल्याची तीन मजली इमारत उठवतों. अगदी सिनेमांतल्या-सारखं साग्रसंगीत बांधकाम ! हं, म्हण तूं. आम्ही करतों कार्याला प्रारंभ !

[मालती हसते आणि गाणें म्हणूं लागते.]

गाणें

पत्त्यांचा सुंदर बंगला । मीं असे आज पाहिला ।। ध्रु० ।।

दुर्री-तिर्री, चव्वा-पंजा । पायांत घातला समजा ।।
पायाभरणी होईल आता । कोण करील त्याची न चिंता ।।
हा गुलाम त्याच्याकरिता ।। १ ।।

एक मजला चढला वर । नव्व्या-दश्शा खांबावर ।।
खिडकीला उभी सत्ती-अठ्ठी । छक्क्याशीं कां फू गट्टी ? ।।
रंगसफेती सांगा एक्क्याला ।। २ ।।

दुसरा मजला चढला वर । राजा-राणी उभे गच्चीवर ।।
देखावा पाहती समोर । आनंद मनामध्यें फार ।।
कोठुनसा वारा आला । कोसळला सारा बंगला ।। ३ ।।

[गाणें होईपर्यंत माधवराव व अरुण पत्त्यांचा बंगला बांधीत असतात. सुधाताई त्यांना एकेक पान देऊन मदत करतात. गाण्याच्या शेवटीं बंगला कोसळतो. मालती हसत हसत ट्रे घेऊन आत जाते आणि अरुण रडूं लागतो.]

माधवराव : अरे अरे, तूं प्रथम कबूल केलं होतंस ना रडणार नाही म्हणून. मग आता कां रडतोस? अरे, तो पत्त्यांचा बंगला आहे. वाऱ्याच्या फुंकरीनं पडणारच. हा कांही खरा बंगला नाही. ताईचं गाणं तूं आत्ता ऐकलंस ना? मग रडणं बंद कर बघूं.

अरुण : (रडत) पण एवढा बांधलेला बंगला कां पडला?

सुधाताई : उगी, उगी, असं रडूं नये. तुला खाऊ देऊं का? चल, डोळे पूस. जा आत, ताई खाऊ देतीय् बघ. तायडे, अरूला फडताळांतली आंब्याची वडी दे हं! जा–रडूं नकोस.

[अरुण डोळे पुसत आत जातो. माधवराव उठून स्वयंपाकघराच्या दरवाजाकडे जाऊन अरुण आत गेला आहे तिकडे बघत रहातात. एकाएकी त्यांचा चेहरा बदलतो. ते उदास होतात. सुधाताई त्यांच्याजवळ येतात.]

सुधाताई : अरुणप्रमाणे तुम्हांलाहि वाईट वाटलेलं दिसतंय्. मोठीं माणसंसुद्धा कधी कधी लहान मुलासारखं वागतात. अरुणबरोबर लहान मुलाप्रमाणं पत्त्यांचा बंगला बांधलात आणि तो कोसळला म्हणून अरुण रडूं लागला आणि तुम्ही उदास झालांत. तो एक साधा पत्त्यांचा खेळ आहे. त्यांत इतकं उदास होण्यासारखं काय आहे?

माधवराव : अरुण रडूं लागला तो त्याचा पत्त्यांचा बंगला कोसळला तें त्याला सहन झालं नाही म्हणून.

सुधाताई : मग, तुम्हांला उदास व्हायला काय झालं?

माधवराव : वाटलं, खाऊच्या निमित्तानं आपण लहान मुलाचं समाधान करूं शकलों, पण —

सुधाताई : म्हणजे?

माधवराव : पत्त्यांच्या बंगल्यावरून मला नेहमी एक गोष्ट आठवते.

सुधाताई : ती कोणती?

माधवराव : आपली! आपल्यासारख्या पांढरपेशा मध्यमवर्गीय कुटुंबाची.

सुधाताई : त्याचा याच्याशीं काय संबंध ?

माधवराव : आपलीहि अवस्था या पत्त्यांच्या बंगल्यासारखीच नाही का ? थोडासा वारा लागला की पत्त्यांचा बंगला जसा कोसळतो तशीच आपली सर्वांची परिस्थिति आहे. एक खांबी तंबूसारखी अवस्था झालीय् आपली. घरांत एक पुरुष मिळवता आणि त्याच्यावर सर्व कुटुंब अवलंबून. आणि आता त्यामध्ये कूळकायदा ! शेतीच्या थोड्याशा धान्याची कुटुंबाला मदत. होती तीहि संपली ! म्हणजे आता सर्व पोकळ झालंय्.

सुधाताई : खरं आहे ! आहे खरी तशी अवस्था. पूर्वी स्त्रियांना शिक्षणच देत नसत, मग त्या तरी कुटुंबाला हातभार कशा लावणार ? माझंच पहा ना ! मी शिकलेली असतें तर माझा नसता का कुटुंबाला कांही उपयोग झाला ? त्यांतून कूळकायद्यामुळं आपली जमीन कुळाकडे गेली. त्यामुळं आपल्या हक्काच्या चटणी-भाकरीलासुद्धा आपण मुकलों.

माधवराव : अग, आपण काय ? आपल्यासारख्या कितीतरी कुटुंबांची तीच अवस्था झालीय्.

सुधाताई : खरंच, याच्यांतून कांहीच मार्ग निघणार नाही का ?

माधवराव : ही पिढी अशीच जायची. पुढच्या पिढीनं मात्र शहाणं व्हावं. आपल्या मुलींना शिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभं करावं, म्हणजे प्रसंग आलाच तर त्या नोकरी अगर अन्य व्यवसाय तरी करूं शकतील.

सुधाताई : खरंच, मीं तर अगदी ठरवलंय् की, आपल्या मालूला खूप खूप शिकवायचं, शहाणं करायचं आणि मगच तिचं लग्न करायचं. जुन्या लोकांसारखं करायचं नाही. आता माझंच पहा ना. माझ्या वेळेला मुलीचं लग्न करण्याची आई-वडिलांना अगदी निकड असायची. एकदा मुलगी उजवली की गंगेत घोडं न्हालं. मला नेहमी वाटायचं, आपण खूप खूप शिकावं म्हणून. पण आमचं म्हणणं त्या वेळीं कुणीं ऐकूनच घेतलं नाही. मोठ्या माणसांच्यापुढं आमचं कांही चालायचंच नाही त्या वेळीं.

माधवराव : खरं आहे. आणि म्हणूनच नवीन पिढीला तरी आपण जपलं पाहिजे. तिचं नुकसान करून चालायचं नाही. वेळ - काळ - परिस्थिती-प्रमाणं वागावंच लागतं.

सुधाताई : (एकदम विषय बदलून) हो ना, आणि म्हणूनच म्हणतें, उठा

आता! आज काळ–रविवार, वेळ–संध्याकाळचे ५ वाजलेले आणि परि-स्थिति–भाजी संपलेली! तेव्हा उठा आणि बाजारांत जाऊन या.

[दोघेहि हसतात.]

माधवराव : अरे हो, खरंच की! पुरता विसरूनच गेलों मी. उद्या आपल्या मालूचा वाढदिवस. तिला एक साडी आणायची असं ठरलंय् नाही का? आणि अरुणला बॅट-चेंडू, आणि —

सुधाताई : आणि याचा इतक्यांत बोभाट करायचा नाही असं पण ठरलंय्! दोघांनाहि याचा पत्ता लागतां कामा नये. एकदम उद्या —

माधवराव : दोघांनाहि आश्चर्यचकित करणें! अरे हो, असंसुद्धां ठरलं होतं नाही का आपलं? विसरलोंच की! हें अस्सं होतं बघ हल्ली!

[माधवराव कोट अडकवून हातांत पिशवी घेऊन जाऊं लागतात तोंच माधवरावांचा मित्र मधुकर आणि त्याची पत्नी मीना दोघेहि येतात.]

माधवराव : या–या–नमस्ते! काय रे मधू, आज आठवण झाली होय रे माझी? मागच्या आठवड्यांत 'उद्या येतों' असं सांगून जो बेपत्ता झालास तो आज उगवतोस होय? काय हो वहिनी?

मधुकर : काय करणार बाबा! पोरींचे बाप झालोंय् ना आपण! त्याचं प्रायश्चित्त भोगतोंय्! पोरींचं लग्न म्हणजे काय हें तुला इतक्यांत कळणार नाही बाबा. जरा बाजारांत येऊन उभा रहा आणि मग बघ! गेले दहा दिवस पायाला नुसती भिंगरी लागलीय्!

माधवराव : अच्छा – अच्छा – म्हणजे जावई शोधण्याच्या खटपटींत आहेस वाटतं?

मीना : हो ना. गेले दहा दिवस आम्ही वरसंशोधनाच्या दौऱ्यावर आहोंत.

माधवराव : (हसून) पण आमच्या घरीं कुणी वर नाही!

मधुकर : कां? तुझ्या मावसभावाचा चुलतभाऊ आहे की! तो इंजिनियर आहे तो!

माधवराव : अच्छा, अच्छा – म्हणजे वसंताबद्दल म्हणतोस होय? पण फार बडं स्थळ आहे बुवा तें! तुला परवडायचं नाही!

मधुकर : हो, तेंहि बाकी खरंच! म्हणजे मी थोडं कुवतीच्या बाहेरचं बोलतोंय्! म्हणजे मी हिलासुद्धा तसं म्हणालों – पण —

मीना : पण मीं तुम्हांला सांगितलं ना, बडं स्थळ असलं तरी चालेल! हुंडा देण्याकरिता मी आपले दागिने विकायला तयार आहें.

सुधाताई : मुलीच्यासाठी हवंच तसं करायला.

मधुकर : छे–छे–छे! मुलीला स्थळं बघून बघून आपण तर अगदी थकून गेलों बुवा! अहो, दिवसेंदिवस आपलं हुंड्याचं मान वाढतच चाललंय्! इंजिनियर वर बघितला की त्याचा भाव पांच हजार रुपये, डॉक्टर बघितला की चार हजार रुपये, वकील बघितला की दोन हजार रुपये! हॅं! आपली तर छाती फुटायची वेळ आली! एकेक रकम ऐकली की हार्टफेल होईल असं वाटायला लागतं!

माधवराव : बाकी वकिलांची किंमत हल्ली उतरलेली दिसते बरं का?

मधुकर : अहो, उतरेल नाही तर काय होईल? घराघरावर वकिलाची पाटी लागलीय् हल्ली. आणि त्यांतून हे निरनिराळे सरकारी कायदे! अहो, वकिलाला कांही कामच उरलं नाही.

माधवराव : बाकी मी म्हणतों, या कायद्यांमुळे आपल्यासारख्या मुलींच्या बापांचा फायदाच झाला म्हणायचा!

मधुकर : अहो, फायदाच नाही तर काय? पाच हजार, चार हजार कुणीकडे आणि दोन हजार कुणीकडे? आपला दोन हजार हुंडा द्यावा की रुबाब करायला मोकळे! "आमचा जावई डबल ग्रॅज्युएट आहे! अगदी बी.ए. एल्एल्. बी. वकील!!"

मीना : पण माझ्या मुलीला इंजिनियरच नवरा पाहिजे!

सुधाताई : किंवा डॉक्टर!

मधुकर : किंवा आय्. ए. एस्.!! अहो, तुम्हां बायकांना नुसतं बोलायला काय जातं? माझ्या उत्पन्नाकडे जरा बघा की! मला पगार किती? मी हुंडा किती देऊं शकेन? अहो, मी साधा दोनशे रुपये मिळविणारा कारकून आणि मला जावई मात्र पाहिजे इंजिनियर!

मीना : अहो, माझे बाबा कारकूनच होते की! त्यांनी नाही का मला तीन हजार रुपये हुंडा दिला?

मधुकर : हो, दिला की! पण तुझे वडील होते पी. डब्ल्यू. डी. खात्यांत कारकून! आणि मी आहें पोस्टांत!

मीना : पण हुंडा दिला हें तरी खरं ना?

मधुकर : हो! पण त्या वेळीं मी नुसता कारकून नव्हतों हें तरी खरं ना? त्या वेळीं आमची पन्नास एकर जमीन होती हें तरी खरं ना? आता मी जमीन घरीं करीत नव्हतों म्हणून ती कुळाकडे गेली तें सोडून द्या! पण मला जो हुंडा मिळाला होता, तो माझ्या कारकुनीकडे बघून नसून जमिनीकडे बघून, हें तरी खरं ना? आत्ता ती जमीन माझ्याकडे असती तर मीसुद्धा तुझ्यासारखाच इंजिनियर जावई पाहिजे म्हणून हट्ट धरला असता! पण काय करतां? तेव्हा म्हणणं एवढंच की, तूर्तास तूं शहाण्यासारखा हट्ट सोडून दे!

माधवराव : खरंच वहिनी, तुम्ही माझ्या मित्राची थोडीशी तरी कीव करा! अहो, कुठून देणार तो पाच हजार रुपये हुंडा? विचारान्तीं तुम्हांलाहि पटेल.

मीना : पण हा मुलीच्या जन्माचा प्रश्न आहे. शिवाय माझे दागिने पण मोडायला मी तयार आहें.

सुधाताई : आपल्या स्त्रियांच्या भावना या पुरुषांना नाहीं समजायच्या!

मीना : आईच्या मुलीबद्दलच्या भावना आई झाल्याशिवाय कशा कळतील?

सुधाताई : आम्ही मुलींच्यासाठीं वाटेल तो त्याग करूं!

मधुकर : आम्हांला आई होतां येणार नाही, म्हणजे तुमचंच म्हणणं खरं मानलं पाहिजे! आता एखादं कोडं सोडवलं पाहिजे म्हणजे पैसे मिळतील!

माधवराव : मुलीचं लग्न म्हणजे कोडंच नाही का? हुंडा, करणी, मानपान, आप्तस्वकीयांना निमंत्रण, जेवणावळी - छे! अहो, डोळे पांढरे व्हायचे! पैसा आणि कष्ट किती खर्च करायचे?

मधुकर : आणि बायकांचीं एकदा रुसणीं - फुगणीं सुरू झालीं म्हणजे कांही विचारूं नका! काय तर म्हणे नारळच दिला नाही - अमुकच दिलं नाही - तमुकच दिलं नाही. एका नारळावरूनसुद्धा भांडणाला सुरुवात होते!

माधवराव : बायकांचीं रुसणीं - फुगणीं सुरू झालीं की मग आपल्या नवऱ्याला पगार किती, जमीन आहे का गेली, जबाबदाऱ्या किती—कशाचंहि भान राहत नाही त्यांना!

मधुकर : त्यांच्या अंगांत विहीण संचारत असेल!

माधवराव : केव्हा या अडाणीपणाच्या डबक्यांतून आपण बाहेर पडणार आहोंत कुणास ठाऊक ?

मधुकर : आपल्या स्त्रिया विचारी बनतील तेव्हा !

मीना : अखेर खापर आमच्याच डोक्यावर फुटलं वाटतं ? आमच्यामुळं समाजांतील सुधारणा जशी काय खोळंबून बसलीय् अगदी !

मधुकर : सगळीच खोळंबली नाही पण लग्नकार्यांतली तरी नक्कीच खोळंबलीय्.

सुधाताई : हें मात्र खरं आहे हं मीनाताई ! या बाबतींत नाहीतरी आपण भारीच हट्टीपणा करतों. तेव्हा यांतूनहि कांहीतरी तोड काढलीच पाहिजे.

माधवराव : अग, अगदी साधी गोष्ट आहे ! तुम्ही स्त्रियांनी लग्नकार्यात तोंडाला कुलूप लावायचं हाच त्याच्यावर उपाय ! त्यामुळं तुमचेहि हाल वांचतील आणि आमचेहि ! काय मधू ?

मधुकर : अरे, नाहीतर काय ? अगदी सोप्या गोष्टी नसता घोळ घालून अवघड करून ठेवतात या. आता हेंच बघ ना, मुलीचं अगर मुलाचं लग्न ठरलं की सर्वांना लेखी निमंत्रणं धाडायचीं, ज्यांना खास जेवणासाठी बोलावायचं असेल त्यांना निराळी भोजनपत्रिका पाठवायची. किती सुटसुटीत आहे सगळं ! पण नाही ! पुरुषमंडळी लेखी निमंत्रणावरून लग्नाला येतील ! पण बायका ? छे ! शोभून दिसत नाही म्हणे तें ! केवळ या बायकांच्यासाठी गावभर पायपीट करावी लागते--हातांत चांदीची वाटी घेऊन अक्षद देत ! नाहीतर मग आहेच टॅक्सी, रिक्षा — निदान टांगा तरी ! !

माधवराव : बाकी लग्नाच्या वेळेला दोन्हीकडील स्त्रियांनी तोंडाला कुलपं लावलीं म्हणजे खरोखरीच सर्व समारंभ व्यवस्थित पार पडतील ! मान-पान, रुसणं-फुगणं सर्व बंद !

मीना : पण मानपान नाही म्हणजे काय ? कमीपणाच नाही का तो ? आपले संस्कार -- आपल्या रूढी —

मधुकर : अग, पण त्या आपल्याच आहेत ना ? मग आपण बदलून टाकूं ! यापुढं मानपान करून घेणं हा कमीपणा समजूं ! अग, आता स्त्री आणि पुरुष दोघांचा दर्जा समान आहे ना ? मग एकानंच मानपान करण्यांत काय अर्थ आहे ? जुन्या रूढी तोडल्याशिवाय हे वाद मिटायचे नाहीत.

सुधाताई : हो ना ; अहो, जुनी अहेर देण्याची पद्धत आणि हल्लीची प्रेझेंट देण्याची पद्धत यावरूनसुद्धा निष्कारण वाद निर्माण होतो.

मीना : हो, पण हल्लीच्या पद्धतीप्रमाणं प्रेझेंट थोडंथोडकं द्यायचं आणि जुन्या पद्धतीप्रमाणं अहेर परत मिळावा अशी अपेक्षा करायची, यामुळंच तर वाद निर्माण होतो.

मधुकर : अग, पण मी म्हणतों अहेर व प्रेझेंटबद्दल गोंधळ करावाच कां मुळी? अहेर ही जुनी पद्धत आहे. अहेर आला तर जुन्या पद्धतीप्रमाणं परत करावा. प्रेझेंट आलं तर योग्य वेळीं परत करावं. अहेर आणि प्रेझेंट यांचीं गल्लत करायचीच नाही.

सुधाताई : मला वाटतं, आमच्या चुका आम्हींच नको का सुधारायला? काय हो मीनाताई, तुम्ही महिला मंडळांत आहांत ना? मग असले कांही ठराव मांडा की तुमच्या महिला मंडळांत!

मीना : पण मला बाई बोलतांच येत नाही!

मधुकर : घरांत मात्र एकसारखी वटवट चालू असते! त्यापेक्षा घराबाहेर जाऊन चार शब्द बोललीस तर समाजाचा फायदाच होईल. निदान नवऱ्याचा!

मीना : एवढं कांही बोलायला नको अगदी! मी बोलेनच मुळी पुढच्या सभेत! अगदी जसं येईल तसं बोलेन!

माधवराव : बाकी वहिनी, तुमच्या महिला मंडळांनी हे ठराव जर पास केले आणि मुख्य म्हणजे त्याप्रमाणं आचरण केलं, तर मधूनं आजपर्यंत भरलेली मंडळाची वर्गणी वसूल झाली असं म्हणायला हरकत नाही.

मधुकर : तेवढं कुठलं आमचं भाग्य! (आठवून) अरे हो, माधव, कमाल आहे आपली! मानापानाचीं बोलणीं झालीं—हुंड्याचीं झालीं—अहेराचीं झालीं आणि मुख्य तशींच राहिलीं!

माधवराव : तीं कोणतीं?

मधुकर : माझ्या मुलीच्या लग्नाचीं—तर म्हणणं काय की तुझ्या मावसभावाचा चुलतभाऊ आहे ना? त्याच्यासाठी आलोंय् आम्ही!

सुधाताई : अहो, पण इंजिनियर जावई नको असं ठरलं ना आत्ताच?

मधुकर : अरे हो! तेंहि खरंच की! आता कशाला त्याची चौकशी?

माधवराव : अरेरे, माझ्या मावसभावाच्या चुलतभावाचं कसं होणार?

मधुकर : पण तुमचा लांबचा आप्त आहे ना तो? त्याची कशाला काळजी करतां?

माधवराव : अरे, पण माझ्याकडे आलास तेव्हा तूंच त्याची जास्त काळजी करीत होतास! आत्ता मी करतोंय् इतकंच! कांही झालं तरी तो माझ्या मावसभावाचा चुलतभाऊ आहे!

मधुकर : मुलीच्या लग्नाच्या वेळेला अशीं दूरचीं नातीं शोधत येतो तिचा बाप. तुला अनुभव नाही अजून.

मीना : शिवाय आमच्या मधाच्या ठरावाप्रमाणं —

माधवराव : तुमच्या महिला मंडळांतील ठरावाशीं आमच्या पसंती नापसंतीचा काय संबंध? तुम्ही तो खुशाल मांडा. त्याची अंमलबजावणी होणार नाही, याची मला पूर्ण खात्री आहे!

मधुकर : मग कशाला तूं काळजी करतोस? तो ठराव मागील ठरावांच्या भेंडोळ्यांत जाऊन बसणारच आहे! तेव्हा तुझ्या मावसभावाचा चुलतभाऊ भाग्यवान् असेलहि कदाचित्! तेव्हा तो लग्नाच्या बाजारांत उभा आहे काय?

माधवराव : तें मी चौकशी करून सांगेन. पण तूर्त मला मात्र खरेदीसाठी बाजारांत जायचंय्! येतोस बरोबर? एकदमच बाहेर पडूं. बाकी आजचा दिवस चांगला गेला हं! हल्ली रविवारचा दिवस कसा जातो समजतच नाही. घराची स्वच्छता, सिनेमा अगर फिरणं, मित्रांच्या गाठी, बाजारहाट—

मधुकर : तरी बरं ख्रिश्चन लोकांच्यासारखी आपली हिंदु लोकांची प्रार्थना नाही दर रविवारीं! नाही तर तें एक कामच व्हायचं!

माधवराव : आठ दिवसांनी एकदा देवाची प्रार्थना म्हणजे इतर कामांच्या-इतकंच त्याचंहि महत्त्व वाटत असेल. बाकी आपण ख्रिश्चन नाही हें बरंच म्हणायचं! आपण देवाला कायमचं फसवूं शकतों. आठ दिवसांनी प्रार्थना नाही आणि दररोजहि नाही!

मधुकर : माधव, देवाची थट्टा केलीस तर वहिनी रागावतील हो!

सुधाताई : संकट आलं म्हणजे तरी देवाची आठवण होतेच की नाही माणसाला? मग एरवी तरी देवाची थट्टा कशाला करावी?

माधवराव : अरे, आज मला बाजारांत जायला मुहूर्त आहे की नाही?

सारखा आपला कांही ना कांही तरी वादाचा मुद्दा निघतोय् ! मालती, हा वाद मिटवण्यासाठी —

[मालती चहाचा ट्रे घेऊन बाहेर येते. पाठोपाठ अरुण येतो.]

मालती : चहा आणला आहे ! !

[मालती कप सर्वांना देते.]

माधवराव : (चहा घेत) वा ! हुशार पोरगी आहेस ! बरं का मधू, उद्या आमच्या मालतीचा वाढदिवस आहे ! आज तिला एक साडी आणायची आहे. कसली आणूं ? आकाशी रंगाची नाही का ? आणि अरुणला —

अरुण : बॅट - चेंडू.

माधवराव : बरोबर ! आणि —

[सुधाताई त्यांच्याकडे रागाने बघतात.]

माधवराव : (आठवून) — आणि ... अरे खरंच की ! नाही, मालती, तुला अस्मानी साडी मुळीच आणायची नाही. आणि अरू, तुला बॅट-चेंडू पण मिळायचा नाही ! हो, सांगून ठेवतोय् ! (सुधाताईकडे बघून) बोभाटा करायचा नाही ना आज ? हां ! सांगून ठेवतोय् !

[सर्व हसतात. मधुकर - मीना आणि माधवराव हसत हसत बाहेर जातात. सुधाताई करवशा आवरूं लागतात.]

सुधाताई : आज फारच पसारा झालाय् हं ! अजून सखू आली नाही का ग ? मालती, जरा आवरायला लागतेस का ?

मालती : हो.

[दोघीहि पसारा आवरूं लागतात. सखू येते आणि स्तब्ध उभी राहते. ती कष्टी झालेली दिसते.]

सुधाताई : (सखूकडे बघून) सखू, आज सकाळपासून तूं कामाला आली नाहीस ? हा पसारा किती पडलाय् बघ. त्यांतून आज रविवार. मित्र-मंडळींच्या येण्याजाण्यानं घरांत केरकचरा फार झालाय्. तू कामाला आली नाहीस की मलाच कामाचा ताण पडतो.

[सखू कांहीच बोलत नाही.]

मालती : सखू, आज स्तब्ध कां ? बोलत कां नाहीस ?

सखू : काय बोलूं ? म्या आज अबोल झालीया.

सुधाताई : अं! नेहमी चेष्टामस्करी करणारी, हसतमुख असणारी आणि एकसारखी बडबडणारी सखू आज अबोल कशी झाली?

सखू : बाई, अबोल व्होवूं नको तर काय करूं? आपलं दुख जगाला सांगण्या-बिगर मनांत ठेवावं ह्येच बरं!

[रडवेली होते.]

सुधाताई : सखू, हें काय सखू? रडायला काय झालं?

मालती : सखू, आमच्यापासून तुझं दुःख लपवितेस? आम्ही परके का आहोंत?

सखू : तसं नव्हं मालूताई. तुमास्नी म्या परकं का मानतें! पर तुमासारख्या कवळ्या पोरीसमोर माजं दुख सांगन तर या पोरीला लई वाईट वाटल, म्हूनशान चूपचाप उभी राहिले.

मालती : सखू, मी तुझी मुलगीच आहें असं समज आणि तुझं दुःख मला सांग.

सखू : काल रात्रीं माज्या दादल्यानं दारू पिऊनशान मला लई झोडपलं! ह्यो बघा वळ.

सुधाताई : सरकारनी दारूबंदी केली तरी हा त्रास अजून संपला नाही म्हणायचा. बघूं, फार लागलंय् का?

मालती : असं कांही ऐकलं की कित्येक वेळा असं वाटतं की, आपण लग्न करूंच नये! करायची काय ही असली गुलामगिरी?

सखू : येडे, समदीं मानसं काय सारखीं असतात होय? आमी लोक अडाणी म्हूनशान दारूपायी बायकोला मार बसतो. दादल्यानंच मारलं म्हंजे जायचं कुठं? सासूसासऱ्यानं जाच केला तर दादल्याकडे तक्रार करतां येते--पण—

मालती : खरं आहे तुझं म्हणणं. नवऱ्यानं मारलं म्हणजे त्यासारखा जगांत दुसरा अपमान नाही-

सुधाताई : सखू, संसार म्हटला की काटेकुटे, खाचखळगे आलेच. त्यांतूनच मार्ग शोधला पाहिजे. रडून तरी काय करणार? चल. मी तुला जेवायला घालतें. जेवण कर, जरा विश्रांति घे आणि मग जा. मालती, सखूच्या जखमेवर मलम लाव.

मालती : लावतें हं.

[मालती सखूला घेऊन आत जाऊं लागते तोंच मधुकर धावत आत येतो. तो अगदी भांबावून गेला आहे.]

मधुकर : वहिनी .... मालती ... वहिनी—
मालती : काय झालं काका ? काय झालं—
मधुकर : मालती .... वहिनी ... घात झाला ... माधव—
मालती : काका !
मधुकर : हो, माधवला अपघात झालाय्... बसखाली... अत्यवस्थ आहे—!
सुधाताई : ऑं ! अ-प-घा-त ! काय ऐकतें मी हें ?
मालती : सखू—यांना—अत्यव्यवस्थ...

[सुधाताईना भोवळ येते. मालती व सखू त्यांना सावरतात. इतक्यांत बाहेर खेळायला गेलेला अरुण धावत आत येतो.]

अरुण : बाबा, आणलांत मला बॅट-चेंडू ! (मधुकरला बघून) अं ? बाबा, कुठायत ? बॅट-चेंडू कुठाय् ?

[मधुकरची अवस्था विचित्र होते. तो त्याला जवळ घेऊन रडूं लागतो. मालती धावत त्याच्याकडे येते.]

मालती : काका—म्हणजे—बाबा—बाबा—अरू—

[एकदम अरूला मिठी मारते.]

[पडदा पडतो.]

◆ ◆ ◆

अंक दुसरा

[काळ : पहिल्या अंकानंतर ६ महिने. वेळ : संध्याकाळ. स्थळ : तेंच. पहिल्या अंकानंतर सहा महिने उलटून गेले आहेत. माधवरावांचा मृत्यु झाल्याने या घरावर आकाशच कोसळलें आहे. सुधाताईच्या कपाळाला कुंकू नाही. माधवरावांच्या तसबिरीला हार घातलेला आहे. पडदा वर जातो, तेव्हा सुधाताई हातमशीनवर शिवण शिवीत बसल्या आहेत. कांही वेळ जातांच मालती बाहेरून येते. चपला काढून आतल्या खोलींत जाते. सुधाताई तिच्याकडे बघतात. कुणी कांहीच बोलत नाही. मालती आतून टॉवेलनं तोंड पुसत बाहेर येते.]

सुधाताई : मालती, आज बालकमंदिरांतून यायला उशीरसा झाला ? आणखी कुठं गेली होतीस ?

मालती : होय, माझी मैत्रीण आहे ना, ती शकू- तिच्याकडे गेलें होतें. आज वाढदिवस होता तिचा, म्हणून मुद्दाम तिनं मला बोलावलं होतं. मी जाणार नव्हतें. पण फारच आग्रह केला तिनं.

सुधाताई : मालू, तुझं बालपण आता संपलं. तूं मोठी झालीस. आता वेळेवर घरीं आलं पाहिजेस. प्रत्येकानं आपली जबाबदारी सांभाळून वागलं म्हणजे

बोलण्याची वेळच येत नाही. त्यांतून घरांतली कर्ती आणि मोठी आता तूंच आहेस.

मालती : आई, या सर्व गोष्टी मला समजतात, पण कांही वेळेला समजत असूनसुद्धा चूक होते. आज मला मैत्रिणीकडे जायला पाहिजे होतं म्हणून घरीं परत यायला उशीर झाला.

सुधाताई : मालती, बाळ रागावलीस? मी तुझ्या भावना ओळखूं का शकत नाही? आज सहा महिने झाले, यांना अपघाती मृत्यु आला आणि प्रपंचाची सारी जबाबदारी या कोवळ्या मुलीवर येऊन पडली! हसण्या-खेळण्याचे तुझे हे दिवस, पण तुझ्या तोंडावरचं हसूं पार मावळून गेलं, तुझ्या चेहऱ्यावर भकासपणा आला आणि हट्टीपणा तर कुठच्या कुठं पळाला!

मालती : आई, बाबांच्या मृत्यूच्या धक्क्यानं मी एकदम मोठी झालें. एखाद्या प्रौढ स्त्रीइतकी विचारशक्ति मला आली. माझं मन म्हणूं लागलं, नुसतं रडून कांही मिळणार आहे का? आपण रडत बसलों तरी आपली विचारपूससुद्धा कुणी करणार नाही. आपले मात्र रडून रडून डोळे सुजतील.

सुधाताई : मालती, असं कां म्हणतेस? सगळीच माणसं वाईट कशी असतील? देवानं कांही माणसांना प्रेमळ अन्तःकरण दिलंच आहे की! त्या माणसांच्या जिवावरच आपल्याला पुढील दिवस काढायचे आहेत. आपली सखूच बघ ना किती प्रेमळ आहे! आज सहा महिने सख्या बहिणीप्रमाणं माझी पाठराखण करते आहे. हे सर्व कपडे तीच नाही का मला शिवण्यासाठी आणून देत. घरच्या घरीं शिवणहि होतं आणि पैसेहि घरपोच मिळतात. माझं शिक्षण मराठी चौथीपर्यंत झालेलं. अशा परिस्थितींत शिक्षण घेऊन नोकरी करणं अशक्यच होतं मला.

मालती : खरंच, सखूसारखीं देवमाणसं आहेत म्हणूनच या जगांत दुःखी माणसाला जगावंसं वाटतं. नाहीतर सर्व घडी विस्कटलेल्या कुटुंबांना या जगांत जगण्यासारखं आहे तरी काय? सखूसारखीं कोमल हृदयाचीं माणसं म्हणजे देवदूतच! (गाणें म्हणूं लागते.)

गाणें

देवा कां दूत धाडिला ।। ध्रु० ।।

खेळ मांडिला संसाराचा ।
फासा पडला सुखदुःखांचा ।
सत्वरीं ही देव ठाकला ।। १ ।।

सहस्र हस्तें दुःख निवारसी ।
परी मानवता कां परदेशी ।
समजे न याच घडीला ।। २ ।।

अघटित करणी तुझी केशवा ।
शांत उभा तूं पाहसि लीला ।
विनविते सोडी मौनाला ।। ३ ।।

[गाणें चालू असतांनाच सखू येऊन उभी राहते.]

सखू : आज ताई गाणं कशापायी म्हणतीया ?

सुधाताई : तुझ्यावरूनच तिला देवाची आठवण झाली.

सखू : माज्यावरून ? पर म्यां देव कंदीबी पुजला नाही!

सुधाताई : तूं पुजला नाहीस ; पण तो तुझ्याजवळच आहे.

मालती : तुझ्या छातीला हात लावून बघ ! (सखू छातीला हात लावते व दचकते.)

सखू : माझ्या छातीला कायनु झालंया ! आक्षी धडाधडा उडतिया ! कंदीबी उडत न्हाई अशी. त्यो परमेस्वर तर आत बसला नसेल ना ?

मालती : (हसत) अग , देव तुझ्या हृदयांत आहे पण तो तुला दिसणार नाही.

सखू : (मालतीला कुरवाळीत गाहिवरून) किती माझी बाई शानी हाय !

मालती : हें काय सखू ? माझ्यासाठी तुझ्या डोळ्यांत अश्रु ! खरंच सखू, तुझ्या या अश्रूंत परमेश्वराचा वास आहे. यामध्येच तुझ्या हृदयाची कोमलता आहे ! दुःखी जिवांसाठी तुझ्या डोळ्यांतून पडलेला हा अश्रु पृथ्वीवरचा दुःखाचा भार हलका करीत आहे

सखू : माळूताई, ही भाषा लई जड हाय. मला यांतलं काय बी समजत न्हाई. फकस्त मदत करायची इकतंच समजतं.

सुधाताई : पण त्यामध्ये साऱ्या विश्वाचं सार आहे.

मालती : तुझ्यासारख्या मोलमजुरी करणाऱ्या स्त्रियांमध्ये अशा परोपकारी भगिनी असतील, याची मात्र आम्हांला कल्पना नव्हती.

सखू : ताई, समदीकडे मानूस म्हटला की येकच ! चांगलं - वाईट लोक समदीकडे असायचंच. म्या खेड्यांतली हाय. अजून शहरगावचं पाणी लागलं न्हाई ! शहरांत जाऊन पैका हाताशीं खेळूं लागला की मानूस मानुसकी इसराया लागतुया. त्याला वाटतं, समदीं कामं पैक्यानं व्हतील. म्हूनशान उन्मत्तावाणी करतो आन् मागं वळून बी बघत न्हाई. हे समदे पैक्याचे ख्योळ हायत बरं, पैक्याचे !

मालती : अय्या सखू, एखाद्या पंडितालाहि लाजवील असं तत्त्वज्ञान तुझ्यापाशीं आहे. पण वेड मात्र काय पांघरते !

सखू : ताई, आमी खेडवळ असलों, गरीब असलों, अडाणी असलों तरी आमाला लई गोष्टी समजतात. पण बोलूनशान दावतां येत न्हाई म्हून येड पांघराया लागतं.

मालती : वा ! आजचा दिवस मोठा चांगला आहे हं !

सुधाताई : कां ?

मालती : नाही, म्हटलं आज एका तत्त्वज्ञानी विदुषीची ओळख तरी झाली !

[अरुण धावत धावत आत येतो.]

अरुण : ताई, आणलीस का मला बॅट-चेंडू ?

मालती : (कावरीबावरी होऊन) नाही, विसरलें. उद्या आणीन हं ! आज किनई कामाच्या गडबडींत मला आठवणच झाली नाही.

अरुण : (हट्टाने) तें कांही नाही ! मला माहीत आहे ! रोज आपली उद्या उद्या म्हणतेस आणि आणीत नाहीस. बाबांनीहि आणली नाही आणि तूंहि—

मालती : (गहिंवरून) अरुण . . . अरुबाळ—उद्या नक्की आणीन हं !

सखू : अरुबाळ, आपल्या ताईला असा तरास देऊं नये.

सुधाताई : अरु, ताईनं बॅट-चेंडू दिला नाही तर मी देईन हं ! जा-आत जा-

आणि हें बघ, तुला पोळीचा लाडू आवडतो ना? आत स्वयंपाकघरांत झाकून ठेवला आहे बघ पातेल्याखाली.

अरुण : आणि तुपाची खरवड ?

सुधाताई : रोज रोज असते वाटतं तुपाची खरवड ?

अरुण : बरं, पण बॅट-चेंडू नक्की आण हं! नाहीतर तूं पण करशील ताई-बाबांसारखं!

[अरुण स्वयंपाकघरांत निघून जातो. सुधाताई, सखू भारावलेल्या नजरेनं तिकडे बघत राहतात.]

सखू : किती गोजिरवाणं पोरगं हाय! (आठवून) बाई, ताईच्या गाण्यामंदी आणि तिचं कौतुक करण्यामंदी म्या इतकी गुंगलें की, ज्या कामासाठी आलें व्हतें त्ये कामवी राहूनशान गेलं. तुमास्नी थोडं काम आणलंया. ह्यो एक शर्ट, ह्ये चार झगं, ह्ये दोन झंपर आणि ह्ये मापाला नग. दोन-चार दिवसांत परत द्यायला हवं. म्या कामाला जातें नव्हं का त्या साठेबाईकडं? त्यांच्या पोरीचं लगीन हाय. म्हूनशान कपडा जरा बिगीबिगी द्या म्हंगाल्या.

[पिशवींतले कपडे देते.]

सुधाताई : (कपडे घेत) वा! वेळेवर आणलेस. नाहीतरी आज मला काम नव्हतंच कांही.

मालती : सखू, तुला काय अन्तर्ज्ञान प्राप्त झालंय् का ग? शिवण नसलं की तुला कसं नेमकं समजतं?

सखू : थट्टा करतेस व्हय ताई? अवं त्यांत काय हाय? जितं जितं कामाला जातें तितं तितं शिवण कवा शिवत्यात ह्ये बराबर ध्यानांत असतं माज्या. अन् लग्न असलं, कार्य असलं की शिवण ठेवलेलं हायच की. फक्स्त सहा घरचं शिवण असतं समदं. अन् आपल्या बाई कपडे काय झ्याक शिवतात! या साठ्यांच्या पोरगीला तर यांच्याशिवाय कुणाच्या हातचा झंपर चालतच नाय! आन् आपल्या बाई शिलाईबी लोकावाणी घेत नाहीत लुबाडूनशान. त्यामुळं समदीकडं यांच्यासाठी शिवण ठेवूनशान देत्याती!

मालती : अरे वा, बरीच व्यवहारी आहेस की तूं सखू! आपलं गिऱ्हाईक कसं सांभाळायचं, हें तुला चांगलंच समजतं. शिलाई थोडी कमी ठेवायला तुला आईनं सांगितलं वाटतं?

सुधाताई : छे, मला कांहीच माहीत नाही. सखू आणून देईल तेवढे कपडे मी शिवतें आणि ती जेवढे पैसे आणून देईल तेवढे घेतें.

मालती : म्हणजे तुम्ही एकमेकींत कांही ठरविलंच नाही वाटतं ?

सुधाताई : सखूच्या बाबतींत करायचा का हा काटेकोरपणा ? उलट आपल्या पडत्या काळांत आपल्या मदतीला ती हाक मारल्यासारखी धावून आली हेच तिचे उपकार आहेत !

सखू : बाई, तुमाला कितीदा सांगितलं—असलं उपकाराचं -बिपकाराचं बोललेलं मला न्हाई चालायचं ! अहो, उपकार कसलं हायत त्यांत ? अजून मानुसकी शिल्लक हाय म्हूनशान् तुमच्या चांगुलपणाला चांगुलपणानं उत्तर मिळतंय इतकंच ! बराय म्या जातें. अजून एका ठिकाणचीं भांडीं राहिलींत. आणि घरीं जायला उशीर झाला तर माझी पाठ मऊ व्हईल ! (सखू जाते.)

मालती : खरंच आई, सखूसारखीं माणसं बघितलीं की जीवनाविषयी उदास झालेलं मन उल्हसित होतं ! वाटतं, जगावं—खूप जगावं—आणि सखू-सारखं प्रेम करावं—साऱ्या जगावर प्रेम करावं—अगदी निरपेक्ष प्रेम !

[बाहेरून हाक येते.]

मधुकर : मालती—ए मालू—

मालती : अग बाई ! काका आले वाटतं ?

[दरवाजाजवळ जाते तोंच मधुकर आणि मीनाताई येतात.]

मालती : या ना काका, या. किती दिवसांनी आलांत आज ! विसरलांत वाटतं या बिचाऱ्या पुतणीला ? काय हो काकू ?

मधुकर : ए बाई, हिला काकू म्हणत जाऊं नकोस हं ! रागावेल ती !

सुधाताई : म्हणजे ? हें काय नवीन प्रकरण ?

मधुकर : अहो, प्रकरण काय घेऊन बसलात ? ही म्हणजे असल्या कितीतरी प्रकरणांचा एक बडा मोठा ग्रन्थ आहे. ' काकू ' हें त्यांतलं चालू प्रकरण.

मालती : म्हणजे ?

मधुकर : परवा आमच्या शेजारच्या जोश्यांच्या नलूनं हिला मीनाकाकू म्हटलं तर काय भडकली ! हिला म्हणे ' काकू ' म्हटलं की एकदम वीस

वर्षांनी म्हातारी झाल्यासारखं वाटतं ! मी म्हणतों , मग आता काय तरणीं आहोंत आपण ? मुलगी मोठी झाली—जावई आला—उद्या नातूसुद्धा होईल !

मालती : काका, मला ठाऊक आहे ! कांहीतरी विषय काढून तुम्ही मुख्य मुद्दा टाळतांय् ! सांगा, कां आलां नाहीत इतके दिवस या लाडक्या पुतणीकडे ?

मधुकर : (चेहरा बदलून) खरं आहे. पण काय करणार पोरी ? रोज यायचं ठरवीत होतों, पण कांही ना कांही अडचणी निघायच्या. घरचीं कामं—ऑफिसचीं कामं—बाकी ऑफिसचीं कामं तूर्त निघायचींच नाहीत म्हणा ! पण ऑफिससाठी मात्र सारखी पायपीट चाललीय्.

मालती : म्हणजे ? असं गूढ काय बोलतांय् काका ? मला तर कांहींच समजत नाही बाई !

मधुकर : सध्या आम्ही बहुसंख्याकांच्या यादींत जमा झालोंय् !

मालती : बहुसंख्याकांची यादी ?

मधुकर : म्हणजे बेकारांच्या यादींत. गेल्या महिन्यापासूनच माझी सरकारी नोकरी गेली. सध्या मिळालीय् एक खाजगी नोकरी. पण तिची शाश्वती कुणीं द्यावी ?

मालती : एकेक ऐकावं तें नवीनच ! कुणाचं कांही चांगलं ऐकायलाच येत नाही ! छे, मला तर धक्का बसला !

मीना : मालती, तुला जर हा धक्का बसला तर माझी काय अवस्था झाली असेल ? कसा सहन करूं मी हा धक्का ? (रडवेली होते.)

सुधाताई : खरं आहे तुमचं मीनाताई. हल्लीच्या दिवसांत नोकरी जाणं म्हणजे मरणच आहे. महागाई भलत्या थराला येऊन पोहोचलेली—जिकडे तिकडे करवाढ. सगळा हलकल्लोळ आहे !

मीना : चांगलं सुखानं आयुष्य काढीत होतों तें दैवाला पहावलं नाही.

सुधाताई : शेवटीं सगळं दैवाधीनच. प्रयत्न करीत राहणं येवढंच आपल्या हातांत आहे !

मधुकर : मीदेखील हल्ली थोडासा दैववादी व्हायला लागलोंय् वहिनी. ध्यानींमनीं नसतांना माझी नोकरी गेली. दुसऱ्यानं केलेली चूक माझ्यावर घालून मला नोकरीवरून काढून टाकण्यांत आलं. माझी हक्काची भाकरी—

माझी जमीन—कूळकायद्यामुळं कुळाच्या मालकीची झाली आणि नोकरीची भाकरीहि गेली! आता नोकरीवर घेण्यासाठी कायदेशीर खटपट करतोंय् मी.

सुधाताई : हं! किती कुटुंबांवर असले दुर्धर प्रसंग आले आहेत कुणास ठाऊक?

मीना : आणि त्यांत इंजिनियर जावई मिळावा म्हणून मी माझे सर्व दागिने विकून टाकले. आत्ता नसते का ते उपयोगी पडले? पण म्हणतात ना? आधी जाते बुद्धि आणि मग जातं भांडवल!

मधुकर : जाऊं दे, कोळसा उगाळावा तेवढा काळाच! बरं, तुमचं ठीक चाललंय् ना सगळं? काय ग मालू?

सुधाताई : आहे त्यांत ठीक आहे म्हणायचं. मालती बालकमंदिरांत नोकरी करते, शिकवण्या करते, मी घरीं शिवण शिवतें. अरुणची शाळा सुरूच आहे. तो मोठा होऊन नोकरीला लागेल तेव्हा हे कष्ट संपायचे. तोंवर हें असंच गाडं रेटायचं.

मधुकर : खरं आहे. माधव मला नेहमी म्हणायचा की, आपल्यासारख्या मध्यमवर्गीयांचं कुटुंब म्हणजे पत्त्यांचा बंगला आहे. कसा आणि कोणत्या क्षणीं कोलमडेल सांगतां येत नाही. एक कर्ता मनुष्य नसला की कुटुंबाची वाताहात होते.

सुधाताई : पण पूर्वीच्या काळीं एवढालीं मोठीं कुटुंबं एका माणसाच्या जिवावर कशीं चालत असत समजत नाही.

मधुकर : पूर्वीच्या आणि आत्ताच्या परिस्थितींत फारच अंतर आहे. पूर्वी सावकारी होती, जमीन होती, शिवाय नोकऱ्या होत्या. त्यामुळं पैसा चोहो बाजूंनी घरांत येत असे. पण आत्ताची परिस्थिति अगदी याच्या उलट. एक फक्त नोकरी! आणि ती गेली की बेकार! माझंच उदाहरण पहा ना. नोकरी होती म्हणून जमीन कुळाकडे गेली आणि आता नोकरी नाही—म्हणजे दोन्ही घरचा पाहुणा उपाशी! अहो, आता तुमचंच घ्या ना. माधवच्या अपघाती मृत्यूमुळं घरांतील नोकरी करणारा कर्ता पुरुष गेला आणि जमीन अगोदरच कुळाकडे गेलेली!

मालती : पण ही घडी बसायची तरी केव्हा?

मधुकर : मध्यमवर्गीय कुटुंबांतल्या प्रत्येकाला काम करण्याची संवय होईल तेव्हा!

मालती : म्हणजे तुमचं म्हणणं तरी काय?

मधुकर : माळीण जशी माळ्याला मदत करते, साळीण जशी साळ्याला किंवा शेतकरीण जशी शेतकऱ्याला मदत करते, तशी मध्यमवर्गीय स्त्री आपल्या कुटुंबाला हातभार लावणारी असली पाहिजे. कुटुंबांतल्या जाणत्या मुलांनी आपापल्या कुवतीप्रमाणं काम करून पैसा घरांत आणला पाहिजे.

मालती : म्हणजे असंच म्हणा ना की कामगार स्त्रियांप्रमाणं मध्यमवर्गीय स्त्रीनंहि काम केलं पाहिजे.

मधुकर : हो! इंग्लंड - अमेरिकेंत स्त्रिया नाहीं का नोकऱ्या करीत? त्या काय हौस म्हणून? छे, केवळ गरज म्हणून! तिकडच्याप्रमाणं आपल्याकडेहि महागाई वाढत आहे, राहणीचं मान वाढत आहे. अशा वेळीं आपणहि तेंच अनुकरण केलं तर काय बिघडलं?

मालती : तें खरं; पण काका, सध्या बेकारी इतकी वाढलीय् की, पुरुषांनाच नोकऱ्या मिळणं कठीण होऊन बसलंय्. मग स्त्रियांनी या जागा अडवून बेकारींत भर घातल्यासारखंच होणार नाहीं का?

मीना : पण मी म्हणतें ज्यांचा प्रपंच भागतो आहे, अशा स्त्रियांनी कशाला काम करायचं?

मधुकर : झालं! म्हणजे हरदासाची कथा मूळ पदावर! बघा वहिनी, आता तुम्हीच सांगा. हिच्यासारखी स्त्री वाटेल त्या प्रसंगाला तोंड देऊं शकेल का? हिला वाटतंय् आता मी इतकं बडबडतोंय् तेव्हा बहुधा उद्या लगेच हिचा हात धरून हिला नोकरीला लावणार! सांगा, सांगा हिला तुम्हीच कांही तरी!

सुधाताई : तसं नव्हे मीनाताई, आपण प्रत्यक्ष काम केलं पाहिजे. असं नाही कांही. काम करण्याची सवय ठेवावी. एखादी कला शिकून ठेवावी. गाणं, ड्रॉइंग, शिल्पकला, नाट्य, वादन, विणकाम, कितीतरी कला आपल्याला काम सांभाळून शिकतां येण्यासारख्या आहेत. माझंच पहा ना. आज मला थोडंसं का होईना शिवण येत होतं तर त्याचा मी उप-जीविकेचं साधन म्हणून उपयोग करूं शकतेंच की नाही? तेव्हा कोणतीहि गोष्ट आंधळेपणानं न करतां त्या कलेचा वेळप्रसंगीं जीवनाला उपयोग होईल इतकी ती जिवंत ठेवावी.

मधुकर : बरोबर, म्हणजे स्त्रियांनी पुरुषांच्या जागा अडविल्यामुळं पुरुष बेकार होणार नाहीत आणि स्त्रियांनाहि काम करण्याची सवय राहील.

मालती : म्हणजे कला जीवनासाठी आहे असंच तुमचं म्हणणं ना?

मधुकर : कलेसाठी कला का जीवनासाठी कला हा वाद साहित्यिकांनी करावा. कला हस्तगत करून ठेवावी आणि ती कायम जिवंत ठेवावी एवढंच आम्हांला समजतं.

मीना : छे, मला तर अगदी भांबावून सोडलंत तुम्हीं. म्हणजे मी नोकरी करूं, का कला शिकूं, का स्वयंपाक करूं?

मधुकर : ज्यांनी जीवनाबद्दल कधीच विचार केला नाही, सदैव भावनेला प्राधान्य दिलं, ते लोक भांबावतील नाही तर काय करतील? त्यांच्या हातून काय होणार आहे? अगोदर भावनाविवश होणार नि मग रडत बसणार!

मीना : मला ठाऊक आहे, इंजिनियर जावई मिळावा म्हणून मीं माझे सर्व दागिने विकले, त्याकरिताच तुमचा माझ्यावर राग आहे. पण खरंच त्या वेळीं चुकलेंच मी. मी फक्त त्या वेळेपुरता विचार केला, खरंच चुकलें!

मधुकर : तुझी चूक तुला समजली ना? ठीक झालं! फक्त अशाच सगळ्या चुका करण्यापूर्वी समजावून घेत जा म्हणजे झालं! एकूण तुझी चूक तुला समजली हा माझा फायदाच झाला!

मालती : असं हो काय करतां काका? मीनाकाकूंनी त्यांची चूक कबूल केली ना? मग पुन्हा पुन्हा कशाला तो विषय काढतां?

मधुकर : बरं बुवा, नाही काढीत. पण प्रथम तूं तुझी चूक कबूल कर बघूं!

मालती : पण माझं काय चुकलं बाई?

मधुकर : हिला परत 'काकू' कां म्हणालीस तूं?

[सर्व हसतात—मीना डोळे मोठे करते.]

मालती : बरं, काका, मी आज तुम्हांला एक विनंति करणार आहें.

मधुकर : कसली?

मालती : तुमच्या खटल्याचा निकाल लागेपर्यंत तुम्ही इकडे कां येत नाही रहायला? म्हणजे चार माणसांत तुमचा वेळ जाईल आणि पुढील कामाची आखणी करायला तुम्हांला स्वस्थताहि मिळेल.

मधुकर : मालती, वेडे पोरी, तूं एवढ्या लहान वयांत तुझ्या स्वतःच्या

जबाबदारीवर तुमचा विस्कटलेला संसार चालविते आहेस, त्याबद्दल मीं तुझं कौतुक करायचं, का मीच तुझ्याकडे येऊन रहायचं? तुमच्याबद्दल माझ्या मनांत प्रेम असूनसुद्धा मला तें बरं वाटणार नाही आणि तें प्रशस्तहि नाही.

सुधाताई : मधुभाऊ, तुम्ही कायमच इथं रहा असं थोडंच ती म्हणतीय्? तुमची नोकरी गेल्यामुळं तुमच्यावर जो मानसिक ताण पडला आहे तो इथे थोडा कमी होईल इतकंच तिचं म्हणणं.

मालती : काका, बाबा गेल्यापासून तुम्हीं मला मुलीसारखं मानलं, आमच्या अडीअडचणीला आम्हांला मदत केलीत आणि आपल्या या लाडक्या पुतणीचं प्रेमाचं निमंत्रण तुम्ही नाकारणार?

मधुकर : ठीक, पोरी, तुझा शब्द मोडणं माझ्या अगदी जिवावर येतंय्. तुझं प्रेमाचं निमंत्रण नाकारलं तर माझ्यासारखा अभागी मीच! मालती, मला पैसा मिळेल, पण तुमच्यासारखीं प्रेमाचीं माणसं मिळायचीं नाहीत. मालू, माधवची मुलगी शोभतेस खरी!

सुधाताई : मधुभाऊ, मीनाताई, आत चला. हाततोंड धुऊन घ्या, तोंपर्यंत मी चहा टाकतें.

मालती : चहा झाल्यावर एकदमच बाहेर जाऊं आणि येतांना तुमचे कपडे घेऊन येऊं, बरं का मीनाकाकू!

मधुकर : काय म्हणालीस?

मालती : चुकलें!

सुधाताई : किती मागं लागायचं एखाद्याच्या? चला आत.

[मीना मनोहर-सुधाताई स्वयंपाकघरांत जातात. मालती टेबलाशीं बसून पुस्तकाशीं चाळा करीत बसते. तोंच प्रकाश येतो. वय २५, बांधा रुबाबदार.]

प्रकाश : मालतीबाई—मालतीबाई—

मालती : (तंद्रींतून दचकून) अं! कोण? आपण?—या—या ना. बसा. आत्ता कसे आलांत? नुकतीच तर मी आपल्याकडून परत आलें.

प्रकाश : आणि म्हणूनच मला तुमच्यापाठोपाठ यावं लागलं. काय विचित्र योगायोग पहा. गेले कित्येक दिवस मी या संधीची वाट पहात होतों.

पण कुणी आमची दखलच घेईना. शेवटी आज तुमच्या या पिशवीला आणि मनीबॅगला आमची कीव आली! घरीं येण्याच्या गडबडींत तशीच टेबलावर विसरलांत.

मालती : अग बाई, खरंच की! बराच वेळ आपल्याकडे बोलत बसलें आणि उशीर झाला तर आई रागावेल म्हणून घाईघाईनं परत आलें. त्या गडबडींत विसरूनच गेलें मी. तरीच बरं का तिथून निघाल्यापासून सारखं कांही तरी विसरलंय् असं वाटत होतं.

प्रकाश : हो ना? आणि तुम्ही गेलांत ना, तेव्हापासून मलासुद्धा कांही तरी हरवलंय्, हरवलंय् असं वाटत होतं!

मालती : अं! (डोळे विस्फारते.)

प्रकाश : नाही···हरवलंय् म्हणजे काय, विसरलंय्! म्हणजे तुमची ही पिशवी हो! आणि ही मनीबॅग घेतली आणि पाठोपाठ धावलों–पण म्हटलं नकोच. असूं दे जवळ आठवण म्हणून—

मालती : अं? काय म्हणालांत? (पुन्हा डोळे विस्फारते.)

प्रकाश : नाही···आपली आठवण हो···म्हणजे कदाचित् तुम्हांला आठवण होऊन तुम्ही परत याल असं वाटलं!

मालती : छे, मला कसली आठवण झालीच नाही. आई रागावेल म्हणून धावत मी इकडे आलें. पण उशीर व्हायचा तो झालाच आणि आई रागावलीच!

प्रकाश : असं? अरेरे! मग आईला तुम्हीं काय सांगितलंत? मी त्यांची क्षमा मागूं का? वाटलं तर माझ्यामुळं उशीर झाला असं सांगूं का?

मालती : नको! तसं कांही करायची जरुरी नाही. तूर्तास मीं तिचं समाधान केलंय्.

प्रकाश : म्हणजे? तुम्ही थापाहि मारतां वाटतं? आईला काय सांगितलंत?

मालती : माझ्या एका मैत्रिणीचा वाढदिवस होता असं सांगितलं.

प्रकाश : अरे वा! म्हणजे कमाल आहे! अहो, शिक्षिकेचा पेशा तुमचा! तुमच्यासारख्या जबाबदार माणसांनीच थापा मारायला सुरुवात केली तर सारी नवीन पिढी थापाडी होईल ना!

मालती : मग मीं आईला काय सांगायला पाहिजे होतं असं तुमचं म्हणणं आहे ?

प्रकाश : नाही, म्हणजे सांगितलंत तें ठीक झालं. पण मला आधी सांगायचं तरी मी थाप मारणार आहें म्हणून !

मालती : कां ?

प्रकाश : नाही, म्हणजे तुम्ही थाप देणार आहांत असं सांगितलं असतंत तर मीं आणखी थोडा वेळ तुम्हांला ठेवून घेतलं असतं आमच्याकडे. एर्वीतेवी तुमच्या मैत्रिणीचा वाढदिवस होताच आज ! मग सहा काय नि आठ काय ! आपलं बोलणं तरी अपुरं राहिलं नसतं !

मालती : ठीक आहे. मग बोला काय बोलायचंय् तें—हं काय बरं आपला मुद्दा होता ? अं ? (विचार केल्याचं नाटक करते.)

प्रकाश : अहो, मुद्दा कसला ? मुद्द्याचंच बोलत होतों आपण ! नाही आठवत ? नीट विचार करा — प्रथम तुम्ही कांहीतरी म्हणालांत. मग मी कांही तरी म्हणालों —

मालती : छे ! अहो, आपण दोघं बोललोंच कुठं मुळी ? तुमची आईच सारखी बोलत होती !

प्रकाश : अरे, खरंच की ! एकटी आईच बोलत होती नाही का ? मग कसं बोललों बुवा आपण ? (विचार केल्याचं सोंग करीत हळूच मालतीकडे बघतो. त्याच वेळीं मालती पण त्याच्याकडे बघत असते. दोघांची दृष्टिभेट होते. मालती लाजते.) हं ! मला वाटतं, असंच बोलत होतों का आपण ? आत्ता-सारखं ? डोळ्यानं !

मालती : अं ?

प्रकाश : नाही, कांही नाही ! आमची आई हो ? ती म्हणाली, " डोळ्यां-समोर सारखी असावी ही पोरगी असं वाटतंय् ! " तुम्हांला घरीं बोलावलंय् तिनं. तुमचा स्वभाव फारच आवडला तिला आणि आमच्या सुरेखालामुद्धा. आणि — बाकी आमची चिमुरडी फारच हुशार आहे हं ! आपल्या बाईचं वर्णन करीत असते सारखं.

मालती : आणि आपल्या घरीं येण्याबद्दल सारखा हट्ट धरून बसते माझ्या-

जवळ. तिचा शब्द मोडवत नाही म्हणून तर माझे पाय तुमच्या घराकडे आपोआपच वळतात.

प्रकाश : असं का ? मग आम्ही खरोखरीच भाग्यवान् की तुमचे आपोआप वळलेले पाय आमच्या घराला लागले ! (आठवून) अरे हो , विसरलोंच की ! काय हो, तुमच्या बालकमंदिरांत कितव्या वर्षापर्यंतचीं मुलं असतात ?

मालती : मुलाला सहावं वर्ष लागलं की प्राथमिक शाळेंत पाठवायचं. कां ?

प्रकाश : (चुकचुकतो) म्हणजे पुढल्या वर्षी सुरेखाला सहावं वर्ष लागणार , मग तिला काढून टाकणार का ? पण मी म्हणतों पालकांची इच्छा असली तर तुम्ही कां ठेवीत नाहीं ?

मालती : मुलाचं नुकसान होतं म्हणून.

प्रकाश : पण मुलांचं नुकसान होतं की नाही , तें पालकांनी ठरवायचं का शिक्षकांनी ?

मालती : तो एक वादाचा प्रश्न आहे.

प्रकाश : ज्यांनी या पूर्वप्राथमिक शाळा काढल्या त्यांच्या लक्षांत आलं असेल की ! बरं , आमचं त्यावर कांही म्हणणं नाही. या शाळा काढल्या तें फारच बरं झालं. पण आम्ही आता अशी मागणी करतों की , सातव्या वर्षापर्यंत त्या शाळेंत मुलं ठेवण्याची परवानगी द्यावी.

मालती : पण ही शाळेची पद्धत सुरू केली तेव्हा हेच पालक याच्या उलट बोलत होते. म्हणायचे , आमचीं नाहीं का मुलं मोठीं झालीं. आणि आता या चिपट्या-मापट्यांना शाळा कशाला ?

प्रकाश : त्या वेळेला तुम्ही इतकं चांगलं शिकवत असाल याची कल्पनाच नव्हती आम्हांला. पाहिल्या बाई नीट शिकवीत नव्हत्या.

मालती : वेळ येईल तसं पालक बोलतात.

प्रकाश : अहो, तुम्ही रागावलांत का या पालकावर? (स्वतःकडे बोट दाखवितो.)

मालती : छे , छे ! रागावून कसं चालेल? आमची शाळाच बंद होईल की मग !

प्रकाश : शाळा मात्र बंद करूं नका हं. तुम्हीं शाळा बंद केलीत तर आमच्या सुरेखाला फार वाईट वाटेल !

मालती : अहो , सुरेखालाच काय , शाळेंतल्या सर्व मुलांना वाईट वाटेल. अहो ,

त्यांच्या घरच्या माणसांनासुद्धा वाईट वाटेल! या छोट्या बालगोपालांना रविवारची सुट्टीसुद्धा आवडत नाही.

प्रकाश : बरोबरच आहे. घरीं असलं की गाणीं नाहीत, गोष्टी नाहीत, खेळणीं नाहीत! सारखं आईचं रागावणं किंवा मार! मग कशाला सुट्टी आवडेल?

मालती : आईला कांही तेवढंच काम नसतं! घरांतलीं सर्व कामं आणि मुलं सांभाळणं म्हणजे एक कसरतच आहे.

प्रकाश : हो ना. पण आज अनेक वर्षे हीच कसरत चालली आहे की!

मालती : पण आता त्यांतून हा थोडासा मार्ग निघालाय्.

प्रकाश : मग मी तेंच म्हणतोंय् की मार्ग निघालाच आहे तर आणखी एक वर्ष वाढवा. सातव्या वर्षापर्यंत.

मालती : अहो, पण तें माझ्या का हातांत आहे? त्यावर कामिटी असते, नियम असतात.

प्रकाश : मला त्या कामिटींतल्या प्रमुखांचीं नांवं सांगा म्हणजे मी त्यांच्याशीं पत्रव्यवहार करीन.

मालती : पण हा नसता खटाटोप कशासाठीं?

प्रकाश : नाहीं, तुम्हांला नाही कळायचं तें! आपल्या ध्येयसिद्धीसाठी पुरुष काय काय करील तें तुम्हांला नाही समजायचं!

मालती : ठीक. पण ही सगळी माहिती काढायला वेळ लागेल. तुमचं ध्येय गाठींपर्यंत दोन वर्षे उलटून जातील.

प्रकाश : म्हणजे, इतका सर्व खटाटोप होईपर्यंत सुरेखा शाळेंतून निघेल पुढल्याच वर्षी?

मालती : असं तुम्ही समजायला हरकत नाही.

प्रकाश : अरेरे! म्हणजे सुरेखा पुढल्या वर्षी तुमच्या शाळेंत नाही; म्हणजे मग तुम्ही आमच्या घरीं कशा येणार?

मालती : न यायला काय झालं? तिनं बोलावलं तर येईन की किंवा दरवर्षी तिच्या वाढदिवसाला तरी नक्कीच येईन!

प्रकाश : हो, म्हणजे आज थाप मारायला मैत्रिणीचा वाढदिवस मिळाला. यापुढं सुरेखाचा वाढदिवस!

मालती : हो, पण फक्त वर्षातून एकदाच!

मालती : तेंच बरं आहे ! कृपा करून आपण इथून जा — प्लीज् !

प्रकाश : पण —

मालती : मला घेरी आल्यासारखं वाटतंय् ! डोळ्यांपुढं अंधेरी आल्यासारखं वाटतंय् —

प्रकाश : आपल्यासाठी मी कांही करूं का ?

मालती : हो, आपण जा. माझ्यासाठी जा — कृपा करा !

[हे सारे संवाद चालू असतांना सुधाताई हातांत चहाचा कप घेऊन बाहेर आलेल्या असतात. दरवाजांतूनच सर्व दृश्य बघत असतात. प्रकाश जातो. मालती तो गेलेल्या दिशेकडे बघते आणि एकदम आवेगानं खुर्चीवर बसून मुसुमुसूं लागते. सुधाताई तिच्याजवळ येतात. तिला कुरवाळतात.]

सुधाताई : मालू — मालू — ए वेडे पोरी, असं काय बरं ?

[सुधाताईना बघून मालतीने आत्तापर्यंत आवरलेला दुःखावेग अश्रुरूपाने वाहूं लागतो. पडदा पडतो.]

◆ ◆ ◆

अंक तिसरा

[काळ : दुसऱ्या अंकानंतरचा दिवस. वेळ : दुपारचे ३॥ किंवा ४ चा सुमार. स्थळ : तेंच. सुधाताई मशीनजवळ कापडाशीं कांही करीत आहेत. मालती स्वयंपाकघरांतून बाहेर येऊन टेबलाजवळ खुर्चीवर बसते. एक पुस्तक घेते – चाळते – ठेवते. दुसरं घेते... एकूण तिची मनःस्थिति बरोबर नाही. सुधाताईंचं तिच्याकडे लक्ष जातं. त्या तिथूनच विचारतात.]

सुधाताई : मालती!

मालती : अं.

सुधाताई : एक विचारूं? रागावणार नाहीस ना?

मालती : काय?

सुधाताई : (उठून तिच्याजवळ येतात.) खरंच, काय झालं? मला नाही का सांगायचं? काल जो प्रकार मीं पाहिला त्यावरून मीं काय समजायचं? ज्या तरुणाला तूं येथून जा म्हणत होतीस, तो कोण?

मालती : आई, एक गोष्ट तुला सांगितली तर मला क्षमा करशील?

सुधाताई : हो, काय झालं सांग बघूं. असा वेडेपणा करूं नकोस.

मालती : आई, मी फार वाईट आहे ग! मी तुझ्याशीं खोटं बोललें! पण

मी तरी काय करूं ग? किती तरी वेळां मीं तुला सांगायचा निश्चय केला. पण धाडसच झालं नाही ग!

सुधाताई : वेडे,आपल्या आईला घाबरतेस होय? सांग पाहूं नीट काय झालंय् तें.

मालती : आई, त्यांची आणि माझी दोन महिन्यांपूर्वीच ओळख झाली. त्यांचं नांव प्रकाश जोशी. त्यांची छोटी बहीण आमच्या बालकमंदिरांत आहे. त्यामुळं त्यांची आणि माझी ओळख झाली. मी अधून मधून सुरेखाबरोबर त्यांच्याकडे जात होतें. आई, मी चुकलें – पण खरं सांगतें हळूहळू सारखं त्यांच्या सहवासांत राहावं असं मला वाटूं लागलं. नाही नाही तीं निमित्तं काढून मी त्यांच्याकडे जाऊं लागलें. त्यांनासुद्धा आनंद होत होता हें त्यांच्या नजरेंतून दिसत होतं. आणि मी त्यांच्या भेटीसाठी तुझ्याशींसुद्धा प्रतारणा करूं लागलें. कां मीं असं केलं? कां मला त्यांच्याबद्दल ओढ निर्माण झाली? कां मी सारखी त्यांच्याकडे जाऊं लागलें? कां मीं त्यांचा सहवास टाळला नाही? आई, आई, तूंच सांग मी अशी कां वागलें ग? मीं वेळींच मोह आवरला असता तर—तर आज ही वेळ आलीच नसती! (रडूं लागते-)

सुधाताई : म्हणजे! काय झालं पुढं? सांग. रडूं नकोस. काल तुमचं भांडण कां झालं? तूं त्यांच्यावर कां रागावलीस?

मालती : नाही, मी कशाला त्यांच्यावर रागावूं? त्यांची काय चूक होती? मींच त्यांना उत्तेजन दिलं नाही का? मग त्यांनी मागणी घातली तर काय बिघडलं?

सुधाताई : म्हणजे काल मागणी घातली त्यानं तुला?

मालती : हं!

सुधाताई : मग त्यांत एवढं रागवायला काय झालं तुला? त्याचं नीट ऐकून तरी घ्यायचंस. तुला काय वाटलं मीं विरोध का केला असता? अग, निदान विचार तरी नक्कीच केला असता. उगीच भांडलीस तूं त्याच्याशीं.

मालती : आई, त्यांचं आणि माझं भांडण होणं शक्य तरी आहे का? पण आई, प्रेम करतांना जो विवेक सुचला नाही तो मागणी ऐकल्यावर दत्त म्हणून मनासमोर उभा राहिला. आपली परिस्थिति काय? त्यांची काय?

वाटलं या जन्मांत तरी हे संबंध जुळणं कठीण आहे त्यांच्यासारखं स्थळ आपल्याला परवडणं शक्य आहे का? त्यांच्याजवळ बंगला आहे—मोटार आहे—आणि मुख्य म्हणजे ते इंजिनियर आहेत!

सुधाताई : म्हणजे केवळ इंजिनियर या एका शब्दाची तूं धास्ती घेतलीस होय? म्हणजे तुझ्या मतें आपल्याजवळ हुंडा द्यायला पांच हजार रुपये नाहीत म्हणून कुणी ती परीक्षा देऊंच नये?

मालती : असं कसं म्हणेन मी आई? पण आपल्यासमोर काकांच्यासारखीं धडधडीत उदाहरणं असतांना आपण आपणहून आपल्या पायांवर धोंडा ओढून घ्यायचा का? जी गोष्ट आपल्या टप्प्यांतली नाही तिचा नाद धरावाच का?

सुधाताई : पण यांत त्यांची काय चूक झाली की तूं अगदी त्यांना घालवून द्यावंस?

मालती : आई, खरं सांगूं का? माझं प्रेम सफल होणं शक्यच नाही या एकाच भावनेची मला चीड आली. माझा राग त्यांच्यावर नव्हता आई, परिस्थितीवर होता!

सुधाताई : पोरी, तुझंच नशीब खोटं. आज तुझे वडील असते तर त्यांनी जबर हुंडा देऊनसुद्धा हें लग्न नसतं का जमवलं?

मालती : हं! हवेत मनोरे बांधण्यांत काय अर्थ आहे?

सुधाताई : मालती, तूं आता मोठी झालीस. तुझं बरं-वाईट तुला समजूं लागलं. बडं स्थळ आपल्या मुलीला मिळावं असं कोणत्या आईला वाटणार नाही बरं? पण कित्येक वेळां मनांत असूनसुद्धा कांही गोष्टी परिस्थितीमुळं करतां येत नाहीत! पण मालू, मीं ठरवलंय्. आपल्या परिस्थितीच्या मानानं स्थळ पाहून यंदा तुझं लग्न करावं. तुझ्या काकांच्या जवळ मी बोललेंय्.

मालती : आई, पण मला तुमचा नको का विचार करायला? आज माझ्या नोकरीवर आणि तुझ्या शिवणकामावर आपण कसा तरी संसाराचा गाडा हाकतोंय्. आणि अशांत उद्या माझं लग्न झालं म्हणजे एक चाक निकामीच की? मग तुझं आणि अरुणचं कसं होईल? शिवाय काकांच्याहि खटल्याचा अजून निकाल लागलेला नाही.

सुधाताई : या महिन्यांत त्यांच्या खटल्याचा निकाल लागेल असं ते म्हणत होते.

मालती : तरीपण मला इतक्यांत लग्न करायचं नाही.

सुधाताई : प्रकाशवर तुझं प्रेम होतं असं आत्ताच म्हणालीस आणि इतक्यांत लग्न करतां येणार नाही असंहि म्हणतेस?

मालती : आई, प्रकाशवर मीं प्रेम केलं हें खरं. पण फार मोठी चूक केली ती मीं! आता मला खरं पटलं की, जीवनामध्ये प्रेमापेक्षा व्यवहाराला आणि भावनेपेक्षा कर्तव्यालाच जास्त जपायला पाहिजे. माझी जबाबदारी मी पूर्ण-पणे जाणतें आई!

सुधाताई : तूं तुझी जबाबदारी जाणतेस त्याचप्रमाणे पालक म्हणून आम्हां-लाहि कांही जबाबदाऱ्या जाणायला लागतातच की!

मालती : अग, पण आपल्या आताच्या परिस्थितींत लग्न करणं कसं शक्य आहे?

सुधाताई : मालू, लग्न ही गोष्ट अशी आहे की, ती वेळच्या वेळीं होण्यांतच अर्थ आहे. अग, आपले हात आकाशापर्यंत पोहोचले नाहीत तरी जवळपास कुठं तरी पोचतीलच की! तुला इंजिनियर नवरा मिळाला नाही तरी निदान साधा कारकून तरी खास मिळेल.

मालती : ठीक, मग मी कारकुनाशींच लग्न करीन आणि तेंसुद्धा काकांना नोकरी लागल्यावर!

सुधाताई : शहाणी माझी पोर ती! मालू, तुझ्यासारख्या समंजस मुलीबद्दल मला किती अभिमान वाटतो म्हणून सांगूं!

[मधुकर बाहेरून येतो. हातांत एक भाजीची पिशवी.]

मालती : काका, काय झालं खटल्याचं?

मधुकर : काय झालं म्हणजे? अग, खटला जिंकणार म्हणजे जिंकणार! आज वकिलांनी अगदी खात्रीनं सांगितलं. "मि. पटवर्धन, पेढ्यांची तयारी ठेवा!" म्हटलं पेढ्यांची कां? जेवणाचीसुद्धा ठेवतों. विचार केला. म्हटलं मालूचे लाडू आणि आमचे पेढे एकदमच देऊन टाकूं!

मालती : हें काय हो काका?

[मधुकरजवळची भाजीची पिशवी घेऊन आत पळते.]

सुधाताई : भाऊजी, काय झालं त्या स्थळाचं?

मधुकर : वहिनी, अहो आपल्याला स्थळं पाहायची जरूरीच नाही मुळी!

सुधाताई : म्हणजे ?

मधुकर : ती जबाबदारी तिनं स्वतःच शिरावर घेतलीय् म्हणे !

सुधाताई : म्हणजे तुम्हांला कसं कळलं ?

मधुकर : वा ! म्हणजे आम्ही काय डोळे मिटून वावरतों वाटतं ? नाही, पण तिचं सिलेक्शन चांगलं आहे.

सुधाताई : अहो पण—

[इतक्यांत अरुण धावत बाहेर येतो. हातांतलें पुस्तकांचें दप्तर टेबलावर आदळतो. सुधाताईंचें बोलणें अर्धवटच राहतें. त्या आत निघून जातात.]

मधुकर : काय अरुण, झाला का धडा वाचून ?

अरुण : हो, केव्हाच !

मधुकर : कोणता वाचलास ?

अरुण : तो तुम्हीच नव्हता का बाहेर जातांना वाचायला सांगितलात ? शककर्ता शिवाजी.

मधुकर : अरे हो ; खरंच कीं ! मग सांग पाहूं शिवाजीनं काय कामगिरी केली ती.

अरुण : (वाचल्याच्या सुरांत) शिवाजीने मराठयांचें राज्य स्थापन केलें !

मधुकर : आणि काय केलं ?

अरुण : त्याचप्रमाणे शिवाजीने गोब्राह्मण-प्रतिपालन केलें.

मधुकर : शिवाजीने प्रथम कोणता किल्ला बांधला ?

अरुण : शिवाजीनं सर्वप्रथम तोरणा किल्ला बांधून मराठी राज्याचं तोरण बांधलं.

मधुकर : शाब्बास ! आता इतिहासांत तुला आज सगळे मार्कस. कालपर्यंतचे किती मार्क झाले ?

अरुण : अं...पंधरा....(बोटं घालीत) सोळा, सतरा, अठरा, एकोणीस......वीस !

मधुकर : मग त्यांत आजचे पांच मिळव.

अरुण : अं – वीस – अधिक (बोटें घालीत) एक एकवीस, बावीस, तेवीस, चोवीस, पंचवीस. (ओरडून) पंचवीस !

मधुकर : बरोबर —

अरुण : काका, मी आता खेळायला जाऊं ?

[मालती हा संवाद ऐकत स्वयंपाकघराच्या दारांत उभी आहे. हातांतील बॅट-चेंडू मागे लपविते व एकदम येते.]

मालती : नाही जायचं !

अरुण : मी – जाणार – तायडे, सोड मला ! – तायडे —

मालती : काय म्हणालास ?

अरुण : तायडे – तायडे – तायडे – !

[मालती एकदम त्याच्यासमोर बॅट-चेंडू धरते आणि लांब होते. ती बघतांच अरुण ताडकन् उठतो आणि तिच्यामागे लागतो.]

अरुण : अं ! बॅट-चेंडू ? बघूं —

मालती : अं हं !

अरुण : असं काय ग ? दे ना !

मालती : आता का ? तायडे नाही का ?

अरुण : बरं नाही, पुन्हा नाही म्हणणार तसं – अगदी शपथ !

मालती : मग काय म्हणशील ?

अरुण : ताई —

मालती : पुन्हा !

अरुण : मालूताई — !

मालती : पुन्हा !

अरुण : (ओरडून) मा–लू–ता–ई ऽ ऽ ऽ अ ! !

[मालती हसते आणि त्याच्याजवळ बॅट-चेंडू देते. अरुण एकदम झडप घालून घेतो.]

मालती : आता झाला ना तुझा हट्ट पुरा ?

अरुण : हो, चल आपण खेळूं या.

[चेंडूची फेकाफेकी सुरू होते. अरुण गाऊं लागतो.]

गाणें

मी खेळिन चेंडू-फळी ।। ध्रु० ।।
चेंडू फेकला इकडुन तिकडे ।
पहा झेलला त्या श्रीरंगें ।
शांत उभी ती मूर्ति सावळी ।। १ ।।
सख्या, श्रीहरि चेंडू दे मज ।
हौस हरी रे खेळाची मज ।
चेंडु उडवुनी दे मजजवळी ।। २ ।।
आला आला रे चेंडू आला ।
गोपाळांचा मेळा जमला ।
उचलुनि घेई हा वनमाळी ।। ३ ।।

[गाणें संपल्यावर अरुण बॅट-चेंडू घेऊन जाऊं लागतो.]

अरुण : मी समोरच्या आवारांत खेळायला जातों हं तायडे ! (निघून जातो.)

मालती : (ओरडून) काय म्हणालास ?

अरुण : (पुन्हा प्रवेशून) ता – य – डे ! (वेडावून निघून जातो. मधुकर व मालती हसतात.)

मालती : खरंच हीं लहान मुलं किती निष्पाप असतात नाही. जणूं देवाचे अवतारच. अगदी निष्काळजी जीव ! कित्येक वेळां मला यांचा हेवा वाटतो. वाटतं आपणहि यांच्यासारखं लहानच राहिलों असतों तर किती बरं झालं असतं. संसारांतल्या दुःखाची यांना कांही कल्पना तरी असते का ?

मधुकर : हें एवढंच वय काय तें आनंदाचं असतं. कसली काळजी नाही की विचार नाही.

मालती : खरंच , मलासुद्धा कधी कधी वाटतं कीं , मी लहान असतें तर माझ्या मनावर कोणतंच दडपण पडलं नसतं.

मधुकर : पण लहान मुलांचं रक्षण करायला मोठीं माणसं लागतातच की ! म्हणून सर्वांना मोठं व्हावं लागतं.

मालती : आमचे बाबा गेले आणि त्याच दिवसापासून मी मोठी झालें. मी माझं दुःख आईला दाखवीत नव्हतें ; पण आतल्या आत कुढत होतें. या यातनांतून मी कधी बाहेर पडेन असं मला वाटलंच नाही. मी नोकरी शोधूं

लागलें. सुदैवानं मीनाकाकूंच्या ओळखीनं मला बालकमंदिरांत नोकरी मिळाली. मुलांच्या मेळाव्यांत मी माझं दुःख विसरलें. माझं मन उल्हासानं भरून आलं. असंच धीरानं पुढं गेलं पाहिजे, असं मनानं सांगितलं. आईच्या आणि माझ्या मिळकतीवर प्रपंच सुरू झाला. या बालकांनीच मला नवजीनन दिलं.

मधुकर : मालती, इतक्या कोवळ्या वयांत तूं इतकी धीरानं वागतेस ह्याबद्दल खरोखरीच तुझं कौतुक करायला पाहिजे. मी चांगला पुरुषासारखा पुरुष असूनसुद्धा कधी कधी माझा धीर खचतो. पण तुझ्याकडे नुसतं बघितलं तरी मी सारं दुःख विसरतों.

मालती : आईला वाटतं बाबांचं दुःख आणि प्रपंचाची झालेली दाणादाण मी पूर्णपणें विसरलें. म्हणून तीहि माझ्याकडे पाहून आनंदी रहाण्याचा प्रयत्न करते.

मधुकर : अग, तुमच्या-आमच्यासारखीं किती तरी कुटुंब आहेत. पण त्यांच्याकडे पहायला कुणाला फुरसत आहे का? पोटापुरते पैसे मिळविणारा आपल्या पोटाच्या मागं आहे आणि भरपूर पैसे मिळविणारा आणखी जास्त पैसे कसे मिळतील याच्यामागं आहे. एकुण काय? कुणालाहि फुरसत नाही.

मालती : म्हणूनच ज्यानं त्यानं आपआपला मार्ग शोधून काढला पाहिजे. कुणाच्या मदतीची अपेक्षा करण्यांत काय अर्थ आहे? मदत येईपर्यंतच खेळ खलास व्हायचा! आपण सर्वांनीच आपली आर्थिक घडी बसविण्याचा प्रयत्न प्रथमपासूनच केला पाहिजे. तहान लागल्यावर विहीर खणण्यांत काय अर्थ?

मधुकर : मालती, तूं म्हणतेस तें खरं आहे. तूं तर त्याचा प्रत्यक्ष अनुभवच घेत आहेस. (आठवून) अरे हो, मालती! तुला एक गोष्ट विचारायची आहे. विचारूं?

[इतक्यांत आतून सुधाताई मालतीला हाका मारतात.]

मालती : आलेंच हं आत जाऊन.

[मधुकर टेबलावरचं वर्तमानपत्र वाचूं लागतो तोंच प्रकाश इकडे तिकडे न्याहाळीत आत येतो.]

प्रकाश : मालतीबाई आहेत का?

[मधुकरचं लक्षच नाही.]

प्रकाश : (जरा जवळ जाऊन) मालतीबाई कुठं आहेत?

मधुकर : कोण आपण? या. कोण पाहिजे आपणांला?

प्रकाश : माझं नांव प्रकाश जोशी. आपण मला कधीच पाहिलेलं नाही. माझं मालतीबाईकडे जरा काम आहे. आपण मालतीचे......

मधुकर : तिचा काका मी. म्हणजे सख्खा नाही! मानलेला. आपण बसा ना. म्हणजे तुमच्याविषयी ऐकलंय् मीं बरंच! मालतीची आणि तुमची काय ओळख?

प्रकाश : अहो, अलीकडेच दोन महिन्यांत ओळख झालीय्. त्या बालक-मंदिरांत शिक्षिका आहेत ना? फार सुंदर शिकवतात!

मधुकर : असं का? म्हणजे तुम्हीपण विद्यार्थी आहांत वाटतं या बालक-मंदिराचे?

प्रकाश : नाही, तसं नाही. माझ्या धाकट्या बहिणीला पोचविण्यासाठी मी बालकमंदिरांत गेलों होतों, त्या वेळीं त्या मुलांना गाणं शिकवीत होत्या. इतक्या गढून गेल्या होत्या कीं, बाहेर कोण आलंय्, कोण नाही, कशाचंच भान नव्हतं त्यांना. आवाज तर इतका छान आहे त्यांचा!

मधुकर : असं का? मग या संगीत मैफली किती दिवस चालल्या होत्या?

प्रकाश : अहो, तुम्ही रागावलांत वाटतं? पण खरं सांगूं, त्या दिवशीच्या त्या गाण्यानं खरोखरीच मला वेड लावलं. पुन्हा मी दोन-तीन वेळां गेलों, पण मला कांही गाणं ऐकायला मिळालंच नाही.

मधुकर : असं का? कां बरं?

प्रकाश : कदाचित् चोरून कुणी ऐकतंय् हें त्यांना समजलं असावं. त्यांनी हल्ली मुळी गाणं बंदच केलंय्.

मधुकर : असं का? अहो, बरोबर आहे. तिनं आपली संगीतसाधना तशीच चालू ठेवली असती तर तुमच्यासारख्या संगीतप्रेमी लोकांचा घोळकाच्या घोळका जमायला लागला असता! अहो, प्रत्येक जण मुलाला पोचवायला आला असता, म्हणजे मग आत बालकमंदिर आणि बाहेर पालकमंदिर! बरं, पण काय हो मि......

प्रकाश : प्रकाश जोशी.

मधुकर : तेंच! मि. प्रकाश जोशी, मालती पण तुमच्याकडे वरचेवर येते, नाही का?

प्रकाश : आं ! नाही .... म्हणजे हो ... पण ... हो , तशा आल्या होत्या दोन-चार वेळेला.

मधुकर : नाही , म्हणजे ती तुमचं गाणं ऐकायला यायची वाटतं ? का स्वतःचं गाणं ऐकवायला यायची ? का तुम्ही दोघं मिळून गात बसायचा ?

प्रकाश : माफ करा , पण तुम्ही इतकं सरळच विचारतांय् तर स्पष्टच सांगतों. खरंच , गेले कांही दिवस आम्ही दोघं मिळून गातोंय्, तिच्या नजरेतील काव्याला माझ्या नजरेची साथ ! इतकं गोड गाणं ! खरंच या गाण्यानं काय जादू केलीय् माझ्यावर !

मधुकर : असं , मग तुमची ही गाण्याची मैफल आमच्याकडे भरवा की एखाद् वेळीं ! कदाचित् या सीझनचं संगीत-पारितोषिक मिळेलहि तुम्हांला ! प्रकाशराव , स्पष्टच विचारतों. पण याविषयी तुम्ही मालूशीं मोकळेपणानं बोललां आहांत का ?

प्रकाश : हो , तसा मी एकदा आलों होतों त्यांच्याकडे. पण त्यांना काय झालं एकदम कुणास ठाऊक ! प्रथम किती चांगलं वागल्या ! पण नंतर एकदम कुठं माशी शिंकली कळेना ! अहो , त्या दिवशीं मीं त्यांना माझी सर्व माहिती सांगितली आणि--आणि त्या दिवसापासून त्यांनी आमचं घरच सोडलं !

मधुकर : असं का ? म्हणजे काय अशी उद्‌बोधक माहिती सांगितलीत तें तरी सांगा !

प्रकाश : अहो , माहिती म्हणजे काय ? नुसतं आपलं या स्थळाचं वर्णन केलं. मुलगा हुशार असून दिसायला स्मार्ट आहे , त्याचा स्वतःचा बंगला आहे--कार आहे-शिवाय-तो इंजिनीरिंगच्या शेवटच्या वर्गाला आहे--आणि-आणि-

मधुकर : एकूण स्थळ बडं आहे ! तुमचा होकार कळल्यावर पुढची बोलणीं करूं ! अहो, मग बरोबरच आहे ती तुमच्याकडे येत नाही तें !

प्रकाश : अहो , बरोबर काय आहे ?

मधुकर : प्रकाशराव , इतके दिवस तुम्ही मालतीच्या सहवासांत आहांत पण नुसतीं काल्पनिक गाणींच गात बसलांत. तिला नीट ओळखलंच नाहीत तुम्ही अजून ! अहो , तुमच्यासारखं चांगलं स्थळ हातचं घालवायला ती का वेडी आहे ? पण प्रकाशराव , एके काळच्या अल्लड पोरीला परिस्थितीनं इतकं प्रौढ आणि विचारी बनवलंय् की, आम्हांलासुद्धा कधी कधी वाईट

वाटतं ! अहो, तुमच्यासारखं बडं स्थळ पेलण्याची ताकद कशी असेल आम्हां सामान्य माणसांत ? आणि त्यांतून तुम्ही इंजिनियर. म्हणजे लग्नाच्या बाजारांत आज तुमचा जवळजवळ पांच हजार रुपये भाव आहे !

प्रकाश : खरं आहे तुमचं म्हणणं. पण माझ्या तशा कांही अटीच नाहीत. अहो, मी आपणहून मागणी घालायला आलोंय्. माझ्या आईला फार आवडलीय् ती !

मधुकर : (मिश्किलपणें) असं का ? पण त्याचा आता कांही उपयोग होईलसं वाटत नाही. अहो, तुमचं तिच्यावर प्रेम होतं तर तुम्ही इंजिनियर व्हायच्या आधी लग्न करायला पाहिजे होतं !

प्रकाश : म्हणजे कमाल आहे ! अहो, तेंव्हा त्यांची नी माझी ओळखसुद्धा नव्हती !

मधुकर : पण त्याला आता मी काय करणार ?

प्रकाश : म्हणजे ! मला आता कांहीच आशा नाही का ?

मधुकर : अगदीच अशा नाही असं नाही. पण त्यासाठी असं रडत बसून चालणार नाही. जरा हीरोसारखं वागायला लागेल !

प्रकाश : सांगा, काय करूं ?

मधुकर : एक युक्ति आहे. पण तुम्हांला ती जमेल का ?

प्रकाश : अहो, न जमायला काय झालं ? प्रेमासाठी काय वाटेल तें करायची माझी तयारी आहे ! सीतेसाठी रामाला जड धनुष्य उचलावं लागलं, कृष्णाला रुक्मिणीसाठी कपटकारस्थान रचावं लागलं; यांतलं मला काय करावं लागेल ?

मधुकर : कपटकारस्थान !

प्रकाश : काम मोठं आहे म्हणून कित्ता पण मोठ्या माणसाचाच गिरविला पाहिजे ! बोला, काय करूं ?

मधुकर : तुम्ही इंजिनियर आहांत असं मालतीला सांगितलं आहेत तें तिच्या मनांतून काढून टाका. तुमची मोटार — बंगला — इस्टेट-सारं खोटं भासवा आणि एक साधे कारकून आहांत असं सांगा.

प्रकाश : म्हणजे ? मी इंजिनियरचा कारकून होऊं ? अहो, फारच खाली आल्यासारखं वाटतं हो ! त्यापेक्षा कारकुनाचा इंजिनियर होण्याचं जमलं

असतं. इंजिनियरचा कारकून ! छे ! अहो, अगदी जिन्यावरून खाली आल्यासारखं वाटतंय् !

मधुकर : अहो, न जमायला काय झालं ? त्यांत काय अवघड आहे ? घटकाभर व्हायचं कारकून ! आम्ही नाही जन्मभर कारकून झालों ?

प्रकाश : छे ! एवढं नाटक करायचं म्हणजे कठीण वाटतं बुवा !

मधुकर : मग मला कशाला विचारलंत ? घरीं जा आणि खुशाल पांच हजार रुपये हुंडा घेऊन येणारी एखादी घोरपड गळ्यांत बांधून घ्या !

प्रकाश : अहो, असं काय करतां ? पण मालतीबाईच्या मनांतला इंजिनियर काढून कसा टाकायचा ?

मधुकर : वा, म्हणजे हें पण मी सांगूं का ? मग तुम्ही काय करणार ? चालवा की थोडंसं डोकं ! म्हणजे हें चांगलं आहे ! कपटकारस्थान करायचं आम्ही आणि हीरो म्हणून मिरवायचं तुम्ही ! तें कांही नाही ! हीरोनंच आपलं कर्तृत्व गाजवावं ! मग बोलावूं मालतीला बाहेर ?

प्रकाश : आता, म्हणजे काय ? त्याच्यासाठीच आलोंय् मी !

मधुकर (स्वयंपाकघराच्या दाराशीं जाऊन) **:** मालती, ए मालती—

[मालती बाहेर येते. प्रथम तिचं प्रकाशकडे लक्षच जात नाही.]

मालती : काय काका ?

मधुकर : हे एक सद्गृहस्थ तुला भेटूं इच्छितात !

[मालती प्रकाशकडे बघते आणि चमकते.]

मालती : ऑं ! तुम्ही—या ना—बसा—काका , हे श्रीयुत—

मधुकर : प्रकाश जोशी ! माझी ओळख झालीय्. तुझीच झाली नसली तर नीट करून घे ! (प्रकाशला) गुड लक् ! (आत जातो.)

मालती : ऑं !....(प्रकाशला) किती वेळ झाला आपल्याला येऊन ?

प्रकाश : हा आत्ताच आलों मी.

मालती : प्रकाश , मला क्षमा करा. काल मी तुमच्याशीं असं तऱ्हेवाईकपणें वागायला नको होतं ! सारं स्पष्टच सांगितलं असतं तर बरं झालं असतं ! पण काय करूं ? फार कोंडमारा झाला हो माझा--फार कोंडमारा झाला ! माझ्या तऱ्हेवाईक वागण्याबद्दल मी तुमची क्षमा मागतें.

प्रकाश : मालतीबाई, उलट मीच तुमची क्षमा मागायला पाहिजे. तुमच्या-

मला मिळालं नाही तरी या कांही दिवसांतल्या गोड स्मृतींवर मी गुजराण करीन. तुमचा सहवास लाभण्याइतका मी भाग्यवान् नसलों तरी तुमच्या नजरेंतील स्नेहाच्या आठवणींवर मी माझ्या कारकुनी आयुष्यांत राम मानून घेईन! खरंच मालतीबाई, प्रेमासाठी माणूस आपल्या माणसाशीं सुद्धा प्रतारणा करतं का हो? माणूस इतका निर्लज्ज बनतो का हो?

[रडण्याचें नाटक करतो. मालती पुरती द्रवून गेली आहे. ती त्याच्याकडे सहानुभूतीनं बघते. स्वतःचा हातरुमाल काढते.]

मालती : प्रकाश! असं काय वरं वेड्यासारखं करतां? पुसा पाहूं डोळे!
[हातरुमाल देते. प्रकाश हातरुमाल घेतो. डोळे पुसतो आणि हातरुमालाकडे बघून—]

प्रकाश : मालतीबाई, तुमच्या या वागण्यावरून तुम्ही मला क्षमा केलीत असं मी समजूं का? आज मी धन्य झालों! आता एकच शेवटची इच्छा!

मालती : प्रकाश!

प्रकाश: मालती—होय—मालती!—आज शेवटची मला तरी तुला एकेरी नांवानं हाक मारूं दे! मालती, हा तुझा हातरुमाल मी माझ्याजवळ कायमचा जतन करून ठेवीन! माझ्या प्रेयसीनं माझ्यासाठी एकदा का होईना पण दाखविलेल्या सहानभूतीची ही आठवण! आयुष्यभर मी माझं खडतर जीवन या रुमालाच्या सान्निध्यानं सुसह्य करूं शकेन! मालती—जातों मी!

मालती : प्रकाश! थांबा—तावडतोब घरीं जाऊन आपलं लग्न ठरलं असं सांगा! मी आई-काकांचा विचार घेतें, तोंपर्यंत तुम्ही तुमच्या घरच्या माणसांची परवानगी घ्या!

प्रकाश : म्हणजे! काय ऐकतोंय् मी हें? मी स्वप्नांत तर नाही?

मालती : नाही! आता तुम्ही स्वप्नांत नाही--मी स्वप्नांत आहे! इतके दिवस उराशीं बाळगलेलं माझं स्वप्न आज साकार होत आहे!

प्रकाश : म्हणजे?

मालती : म्हणजे तावडतोब जा आणि तयारीला लागा! मला अशीच या स्वप्नांत रंगून जाऊं दे! जाईजुईच्या सुगंधानं मला असंच न्हाऊन निघूं दे!

[प्रकाश जातो. मालती दरवाजाकडे जाते. तो गेला त्या दिशेकडे बघते आणि वळून गाणं म्हणूं लागते.]

गाणें

या शुभ वेला, सूर्य उदेला ।। ध्रु० ।।
रविकिरणांचा प्रकाश पडला ।
रजनीचा जणु अस्त जाहला ।
प्रभातकिरणें सुखवि मनाला ।। १ ।।
जाइजुईचा सुगंध पसरे ।
गुलाब स्पर्धा करुनी बहरे ।
गुलाब हसला बघुनि जाइला ।
फुलें जमवुनी गुंफूं माला ।। २ ।।

[हें गाणें चालू असतांनाच स्वयंपाकघराच्या दारांत प्रथम मधुकर आणि नंतर सुधाताई व मीना येऊन उभीं राहतात. मालतीचें तिकडे लक्षच नसतें. ती गाण्यांत गुंगली आहे. गाण्याच्या शेवटीं—]

मधुकर : वा वा ! वा वा ! वन्स मोअर ! काय ग मीना ? आता वाजले किती ग ?

मीना : मला वाटतं संध्याकाळचे पांच !

मनोहर : अं हं ! आपला नाही विश्वास बसत !

मीना : कां ?

मनोहर : हूं ! अग, संध्याकाळीं पांचला कुठं सूर्योदय होतो वाटतं ? आणि जाईजुईचा सुगध संध्याकाळीं पांच वाजतां पसरतो वाटतं ? आपण कुठं आहोंत ? स्वप्नांत तर नाही ? हा सूर्योदय--हीं प्रकाशकिरणं--ह्या जाईजुई--ह्या गुलाब—

मालती : (लटक्या रागानं) काका !

मधुकर : मालती, खरंच काय किमया झाली ग ? आज पांच वाजतां सूर्योदय कसा झाला ? या खोलीचं रूपांतर बगीच्यांत कसं झालं ? आणि--ह्या मालतीकडे कुठला माधव येऊन गेला ?

मालती : असं काय हो काका ? आई, आत्ता प्रकाश येऊन गेले ! हो आई !

मी त्यांच्या मागणीचा स्वीकार केला. आई, आम्हांला आशीर्वाद दे ! आई, आम्हांला आशीर्वाद दे !

मधुकर : अग, पण पांच हजार रुपयांची काय सोय ?

मालती : नाही, आता त्यांची जरुरी नाही. त्यांनी सगळं सांगितलं मला. ते इंजिनियर नाहीत ! त्यांचा बंगला नाही ! त्यांची मोटार नाही ! साधे कारकून ! ६०-४-१२० ग्रेडचे साधे कारकून ! आशीर्वाद दे तूं आई, आशीर्वाद दे !

मीना : म्हणजे, तो इंजिनियर आहे असं वाटलं म्हणून नकार दिला होता होय तिनं ? कमाल आहे !

मधुकर : कमाल काय आहे ? तिच्याजवळ दागिन्यांचा डबा नाही आहे पांच हजार रुपये हुंडा द्यायला !

सुधाताई : मालती, तुला स्थळ पसंत असलं तर मी नकार देईन का ? अग, आई नेहमी आशीर्वादच देणार आपल्या पोरीला !

मालती : आई, अग, आपल्या ऐपतीप्रमाणंच स्थळ नको का शोधायला ? आर्धा कर्ज करून ठेवायचं आणि मग फेडत बसायचं ? सांगितलाय कुणी हा उपद्व्याप !

मधुकर : मालती, खरंच तूं किती शहाणी आणि विचारी आहेस ! चला, आत्ताच जातों आणि प्रकाशला घेऊन येतों —

मालती : अहो, पण त्यांचं घर —

मधुकर : मला माहीत आहे !

मालती : म्हणजे ?

मधुकर : तुझ्या 'काकू'ला विचार ! (जातो.)

मालती : (आश्चर्यानं) मीनाताई ! तुम्हांला कसं माहीत ?

मीना : अग, माझ्या महिला मंडळांतील मैत्रिणीचाच मुलगा हा !

मालती : म्हणजे ?

[सखू प्रवेश करते.]

सखू : (सगळ्यांकडे नजर टाकून) आपल्या ताईचं लगीन जमतंया जनु !

सुधाताई : तुला कुणी सांगितलं ?

सखू : मधुकरकाकानं. आत्ताचं भेटलं नव्हं का ! झ्याक ! बडा अधिकारी

नवरा मिळालाय् ताईसायबांना! चैन हाय बाबा! बंगला काय! मोटुर काय!

सुधाताई : म्हणजे! असं कुणीं सांगितलं तुला? अग, साधा कारकून आहे हिचा नवरा!

सखू : छे! मग मधुकरकाका काय खोटं बोललं व्हय?

सुधाताई : अग, त्यांनी चेष्टा केली असेल तुझी!

मालती : होय, त्यांना येतां-जातां सगळ्यांची टिंगल करायची सवयच आहे.

[मधुकर प्रकाशला घेऊन येतो.]

मधुकर : जावईबुवांना घेऊन आलों आहें. शुभस्य शीघ्रम्! या-या आत—

मीना : ये, आत ये प्रकाश. अरे, असा लाजतोस काय?

मालती : म्हणजे? तुम्ही दोघंहि यांना ओळखतां?

मधुकर : अं हं! मी यांना ओळखत नव्हतों; पण मीना ओळखते. आणि मी—मी यांना चांगला ओळखून आहें! आजच्या शुभ मुहूर्तावरच साखरपुडा करूं या! प्रकाश, मालती, इकडं या! (दोघांचे हात एकमेकांच्या हातांत देतो.)

प्रकाश : मालती, मला क्षमा कर! मीं तुला फसवलं आहे! मी इंजिनियर नसून कारकून आहें असं तुला सांगितलं तें केवळ तूं होकार द्यावा म्हणून!

मालती : म्हणजे?

मधुकर : जाऊं द्या हो! कृष्णालासुद्धा खोटं बोलावं लागलं!

सुधाताई : म्हणजे? तुमचंहि अंग आहे वाटतं या कारस्थानांत?

मधुकर : चालायचंच! कांहीं झालं तरी आम्ही पुरुषमाणसं एक होणारच!

मीना : अहो, तेवढं सोडा हं! वास्तविक या प्रसंगाचं सारं श्रेय मलाच मिळालं पाहिजे! काय रे प्रकाश?

प्रकाश : खरं आहे. मीनाताईच्या आग्रहानंच मीं मालतीशीं ओळख वाढवली!

सुधाताई : ऐकावं तें नवलच! म्हणजे एखादी नाटक कंपनी तर जमा झाली नाही आमच्या घरीं?

मधुकर : वहिनी, आम्ही जरी नाटकी असलों तरी या दोघांचं प्रेम हें मात्र नाटक खास नव्हे! प्रकाश, आपल्यासारख्या थोर मनाच्या माणसांच्यावरच समाजाची भिस्त आहे. ही आमची सखू! गरिबी असूनसुद्धा माणुसकी

विसरली नाही अजून. आपल्यासारखे थोर मनाचे लोक आणि सखूसारखीं प्रेमळ हृदयाचीं माणसं म्हणजे आमच्यासारख्या मध्यमवर्गीयांचे आधारच आहांत !

प्रकाश : अहो, आता किती वर्णन करणार ?

सुधाताई : खोटं नाही भाऊजींचं म्हणणं ! प्रकाश ! आमच्यासारख्या कुटुंबांचे पत्त्यांचे बंगले परिस्थितीच्या झुळकीनं कोलमडून पडले आणि त्यांच्या संसाराची घडी विस्कटली तरी ती घडी बसवायला सखूसारखीं प्रेमळ हृदयाचीं आणि तुमच्यासारखीं थोर मनाचीं माणसं असल्यावर ती घडी बसायला कितीसा वेळ लागणार ?

प्रकाश : अहो, स्तुतीनं माझा जीव गुदमरून गेला हो !

मधुकर : यावर चहा हेंच उत्तम औषध आहे !

सुधाताई : थांबा हं, मी चहा टाकतें. (आत जातात.)

मालती : काका, तुम्ही मात्र पक्के लबाड आहांत बरं का ? स्वतःच सगळीं कारस्थानं करून पुन्हा आम्हांला मूर्ख ठरवायला मोकळे ! काय हो काकू ?

मधुकर : अँ ! काय म्हणालीस ? चुकलें म्हण ! चुकलें म्हण !

मालती : खरंच चुकलें !

मधुकर : (मीनास) ए, अग, नुसताच चहा देणार वाटतं ? कांदा-पोहे, शिरा – कांहीतरी कर !

[मीनाला आत जाण्यास खुणावतो. मीना जाते.]

मधुकर : अच्छा प्रकाश !

मालती : म्हणजे ! तुम्ही कुठं निघालांत ?

मधुकर : साखरपुड्यासाठी पेढे घेऊन येतों ! अच्छा – (दरवाजापर्यंत जाऊन) गुड लक् !

[मधुकर जातो. क्षणभर शांतता.]

प्रकाश : मालती !

मालती : अं !

प्रकाश : रागावलीस माझ्यावर ?

मालती : आपण फार थोर मनाचे आहांत.

प्रकाश : सर्व गोष्टींपेक्षा तूं माझ्यावर जें प्रेम दाखवलंस त्या प्रेमानं मला हुंडा, मानपान सगळं मिळालं! एवढ्यासाठी का हट्टून बसली होतीस? पण आता तरी माझ्या प्रेमाची खात्री पटली का?

मालती : अशा प्रेमाला अग्रस्थान मिळालं तर सारं जग सुखी होईल!

प्रकाश : पण त्यासाठी मला कारकून व्हायला लागलं!

मालती : स्वतःला कमीपणा घेण्यानंच आपला मोठेपणा वाढत जातो.

प्रकाश : मालती!

[आवेगानं तिचा हात धरतो तोंच आंतून अरुण बाजा वाजवीत येतो. दोघंहि दचकून हात सोडवून घेतात.]

अरुण : (सुरांत) **आमच्या ताईचं लगीन**
आमच्या ताईचं लगीन !

[अरुण दोघांच्याभोवतीं फिरूं लागतो. दोघंहि हसतात. पडदा पडतो.]

◆ ◆ ◆